


RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




रविवार, ०४ जानेवारी २०२६ | वर्ष : ६ | अंक : १० | दैनिक | किंमत : ₹५/-

Sunday, 04 January 2026 | Year : 6 | Issue : 10 | Daily | Rate: Rs. 5/-

## छत्तीसगडमध्ये चकमक, 14 नक्षलवादी ठार

**रायपूर :** छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलाने केलेल्या कारवाईमध्ये 14 नक्षलवादी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. छत्तीसगडच्या सुकमा आणि बिजापूर जिल्ह्यात शनिवारी सकाळी सुरक्षा दलाच्या जवानांनी दोन ठिकाणी वेगवेगळी कारवाई केली. या दोन्ही ठिकाणच्या कारवाईत एकूण 14 नक्षलवादी ठार झाले आहेत.

तसेच सुरक्षा दलांकडून अद्यापही शोध मोहीम सुरू असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. या चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांमध्ये 8 लाख रुपयांचं बक्षीस असलेला नक्षलवादी कमांडर मंगडू याचाही समावेश आहे.



पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सुकमाच्या किस्ताराम भागात सुरक्षा दल शोध मोहीम राबवत होते. यादरम्यान त्यांचा नक्षलवाद्यांशी सामना झाला. सुकमा जिल्ह्याच्या दक्षिणेकडील एका जंगलात सुरक्षा दलांचं एक संयुक्त पथक ही कारवाई करत होतं. पहाटेपासून गोळीबार सुरू झाला होता आणि तो अधून-मधून सुरूच होता. या कारवाईनंतर घटनास्थळावरून अनेक मृतदेह सापडले आहेत. जवानांनी घटनास्थळावरून AK-47 आणि इन्सास रायफल देखील जप्त केल्या. तसेच हे ऑपरेशन अद्याप संपलेलं नसून पुढील कारवाई सुरू असल्याची माहिती सांगण्यात आली आहे.

पहाटे सुरक्षा दलाचे एक पथक जंगलात छापा टाकण्यासाठी पोहोचले. यादरम्यान, नक्षलवाद्यांनी सैनिकांवर गोळीबार केला. दोन्ही बाजूंमध्ये सुमारे एक तास चकमक चालली, ज्यामध्ये 14 नक्षलवादी मारले गेले. परिसरात अजूनही शोध मोहीम सुरू आहे आणि मृतांचा आकडा वाढू शकतो अशी अटकळ आहे.

40 वर्षीय वेट्टी मुका उर्फ मंगडू हा सुकमा जिल्ह्यातील गोगुडा गावचा रहिवासी होता. तो अनेक वर्षांपासून नक्षलवादी संघटनेशी संबंधित होता आणि कोंटा एरिया कमिटीचा सचिव म्हणून काम करत होता. अनेक नक्षलवादी हल्ले करणारा मंगडू AK-47 सारखी शस्त्रे बाळगत होता. प्रशासनाने त्याच्यावर 8 लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते.

### शोध मोहीम अद्यापही सुरूच

सुकमा पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सुरक्षा दलांचे एक पथक जिल्ह्याच्या दक्षिणेकडील भागातील जंगलात अद्यापही कारवाई करत आहे. हे ऑपरेशन अद्याप संपलेलं नसून संपूर्ण परिसरात कसून शोधमोहीम राबवण्यात येत आहे.

## बिहारमध्ये 25 हजारांत मुली लग्नासाठी मिळतात

### भाजपाच्या मंत्र्याच्या पतीचे वादग्रस्त विधान

**नवी दिल्ली :** उत्तराखंडच्या महिला आणि बालविकास मंत्री रेखा आर्या यांच्या पतीनेच महिलांविषयी अत्यंत खालच्या शब्दांत टीका केली आहे. तरुणांच्या गटाशी संवाद साधत असताना त्यांनी बिहार येथील महिलांबाबत आक्षेपार्ह विधान केलं आहे. त्यांच्या या विधानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त केला जातोय.

बिहारमध्ये 20 ते 25 हजारांत मुली लग्नासाठी मिळतात, असं वक्तव्य महिला आणि बालविकास मंत्री रेखा आर्य यांचे पती गिरधारी लालू साहू यांनी केलं आहे. गिरधारी लालू साहू तरुणांशी संवाद साधत होते. त्यावेळी एका तरुणाशी बोलताना साहू म्हणाले, तुम्ही म्हातारपणी लग्न करणार आहात का? तुम्हाला लग्न करायचं असेल तर बिहारमधून मुलगी आणुया. तिथे 20 ते 25 हजारांत मुली मिळतात.

गिरधारी लालू साहू यांच्या या वक्तव्यामुळे उत्तराखंड आणि बिहारमध्ये संतापाची लाट उसळली आहे. तसंच, बिहार राज्य महिला आयोगानेही याची दखल घेतली असून साहू यांना नोटीस बजावली आहे.



काँग्रेस महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा ज्योती रौतेला म्हणाल्या, साहू यांचं वक्तव्य लज्जास्पद आहे. त्यांची पत्नीच महिला आणि बालकल्याण मंत्री आहेत. हा महिला आणि मुलींच्या प्रतिष्ठेवर हल्ला आहे. अशा प्रकारची विचारसरणी मानवी तस्करी, बालविवाह आणि महिलांचं शोषण यांसराख्या सामाजिक दुष्कृत्यांना प्रोत्साहन देतं.

## महत्त्वाच्या बातम्या

### 'अजित पवारांना सोबत घेतल्याचा पश्चाताप': रविंद्र चव्हाण

**पुणे :** राज्यातील 29 महापालिकांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात घडामोडींना वेग आला आहे. सध्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असून महायुतीच्या नेत्यांमध्येच जुंपल्याचं पाहायला मिळत आहे. अजित पवारांना सोबत घेतल्याचा पश्चाताप असल्याचं मोठं वक्तव्य रविंद्र चव्हाण यांनी केलं. तसेच 'आम्ही बोलायला लागलो तर अजित पवारांच्या अडचणी वाढतील', असा इशाराही रवींद्र चव्हाणांनी दिला. तर दुसरीकडे 'भाजपाला शिवसेना नकोय', असं मोठं वक्तव्य उदय सामंत यांनी केलं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे भाजपासोबत कशापद्धतीने जोडले गेले, हे सर्वांना माहिती आहे. त्यांना सोबत घेण्याबाबत पुणे, पिंपरी-चिंचवडमधील पक्षाचे पदाधिकारी मला थोडा विचार करा म्हणून सांगत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही मी नेहमी खासगीत सांगायचो की थोडा विचार करावा. पण आता पवार यांना सोबत घेत असल्याचा पश्चाताप होत आहे', असं मोठं वक्तव्य रविंद्र चव्हाण यांनी केलं. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील भाजपा उमेदवारांच्या प्रचाराच्या शुभारंभाच्या निगडीतील कार्यक्रमात चव्हाण बोलत होते.

### विद्यार्थ्यांचा छळ करून सरकारला काय मिळणार? : यशोमती ठाकूर

**अमरावती:** गेल्या 7 महिन्यांपासून पीएसआय परीक्षेची तयारी करणारे हजारो उमेदवार सरकारकडे वयोमर्यादा वाढीबाबत पाठपुरावा करत आहेत. पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले, आज 4 जानेवारी रोजी परीक्षा आहे.

पुण्यात विद्यार्थी रस्त्यावर उतरल्यानंतर पोलिसी बळाचा वापर केला केला. सरकार अतिशय दुटप्पी भूमिका घेते आहे. विद्यार्थ्यांचा छळ करुन सरकारला काय मिळणार आहे ? पण, जर 7 महिन्यांपासून पीएसआय परीक्षेबाबत विद्यार्थी तुमच्याकडे मागणी करत आहेत, फाईल मुख्यमंत्र्यांच्या टेबलावर आहे तर मग विद्यार्थ्यांचे हाल का केले जात आहे?, असा सवाल काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी केला आहे. यशोमती ठाकूर म्हणाल्या, सरकारच्या दुटप्पी भूमिकेचा आम्ही निषेध करतो. काँग्रेस पक्ष म्हणून आम्ही सर्व विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब फाईलवर सही करावी आणि जीआर काढावा, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. अन्यथा, खबरदार हे आंदोलन इथे थांबणार नाही. न्यायासाठी हे आंदोलन आहे, न्याय मिळाल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही.

## अमेरिकेचा व्हेनेझुएलावर हवाई हल्ला

**नवी दिल्ली :** लॅटिन अमेरिकेतील राष्ट्र व्हेनेझुएला आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष पेटला असून आज सकाळी अमेरिकेने व्हेनेझुएलाची राजधानी कराकसवर हवाई हल्ले केले. त्यानंतर काही तासात अमेरिकन सैन्याने व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेतल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ या सोशल मीडिया साईटवरील हँडलवर याची माहिती दिली. ते म्हणाले, अमेरिकेने आज व्हेनेझुएला आणि त्यांच्या नेत्यांविरुद्ध मोठी कारवाई केली. अमेरिकन सैन्याने या कारवाईत व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेतले असून देशाबाहेर काढले आहे.



या हल्ल्याबाबत सविस्तर माहिती अमेरिकन वेळेनुसार सकाळी 11 वाजता मार-ए-लोगो येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली जाईल, असेही ते म्हणाले.

शनिवारी पहाटे स्थानिक वेळेनुसार राजधानी कराकसमध्ये बॉम्बस्फोट झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांनी व्हेनेझुएलामध्ये राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली. यानंतर कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावा पेट्रो यांनी हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा देत ऑर्गनायझेशन ऑफ अमेरिकन स्टेट्स (OAS) आणि संयुक्त राष्ट्रांची आपत्कालीन बैठक बोलावण्याची मागणी केली. राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांचा गुरुवारी एक व्हिडीओ प्रसारित झाला होता. व्हेनेझुएलामधील राजवट बदलण्यासाठी ट्रम्प प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. व्हेनेझुएलामधील विस्तृत असे तेल साठे मिळवण्यासाठी अमेरिकेकडून कोणत्याही वेळी हल्ला होऊ शकतो, असा कयास त्यांनी बांधला होता.

आज सकाळी अमेरिकेच्या हल्ल्यानंतर व्हेनेझुएलाच्या सरकारने अमेरिकेचा निषेध केला. तसेच या हल्ल्यामुळे संपूर्ण लॅटिन अमेरिकन प्रदेश अस्थिर होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली.

अमेरिका आणि लॅटिन अमेरिकन देश असलेल्या व्हेनेझुएलाचे संबंध गेल्या अनेक वर्षांपासून ताणले गेले आहेत. व्हेनेझुएलामधून अमेरिकेत मोठी ड्रग्ज तस्करी होत असल्याचा आरोप डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. दुसरीकडे- व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांनी अमेरिकेचे ड्रग्ज तस्करीचे सर्व दावे फेटाळून लावले आहेत. यादरम्यान त्यांनी व्हेनेझुएलावर अनेक निर्बंधदेखील लादले आहेत. गेल्या आठवड्यात डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाची हवाई हद्द बंद करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर अमेरिकेचे हे पाऊल वसाहतवादी असल्याची टीका व्हेनेझुएलाकडून करण्यात आली होती.

## बिहारमधून वाढल्या यवतमाळच्या जन्मनोंदी!

**यवतमाळ :** आर्णी तालुक्यातील शेंदूरसनी ग्रामपंचायतीत गावाच्या लोकसंख्येपेक्षा अधिक जन्म-मृत्यू नोंदी आढळल्याने प्रशासनात खळबळ उडाली होती. या प्रकरणी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. अत्यंत क्लिष्ट तपास असलेल्या या प्रकरणाचे धागेदोरे थेट बिहार राज्यात आढळले. यवतमाळ जिल्ह्यातील जन्म, मृत्यू नोंदी बिहारमधून वाढविण्यात आल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या पथकाने बिहारमधून एका आरोपीला ताब्यात घेतले आहे.

आदर्शकुमार दुबे, असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. शेंदूरसनी ग्रामपंचायतीच्या सीआरएस सॉफ्टवेअर लॉगिनमध्ये सप्टेंबर ते नोव्हेंबर 2025 या कालावधीत 27 हजार 397 जन्मनोंदी व सात मृत्यूनोंदी आढळून आल्या. गावाची लोकसंख्या सुमारे एक हजार 400 असून, एवढ्या मोठ्या प्रमाणात नोंदी आढळणे संशयास्पद होते. या नोंदी सायबर फसवणूक असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी दिलेल्या तक्रारीवरून यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याची व्याप्ती, किचकट स्वरूप आणि तांत्रिक गुंतागुंत लक्षात घेता, पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी तपास उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्याकडे सोपविला होता. दिनेश बैसाने यांनी बनावट प्रमाणपत्र तयार होण्याच्या प्रक्रियेचा सखोल तपास केला.

## बिनविरोध विजयी उमेदवारांच्या विरोधात राज ठाकरे कोर्टात जाणार

**मुंबई :** राज्यात 29 महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. काल (शुक्रवारी) उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे बंडखोरांची नाराजी दूर करून त्यांची मनधरणी करणे प्रत्येक पक्षासमोर आव्हान होते. त्यात भाजपाने अनेक नाराजांची समजूत काढण्यात यश मिळवले. त्याशिवाय अपक्ष आणि प्रमुख विरोधी पक्षांनी ऐनवेळी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने राज्यात महायुतीचे 65 उमेदवार बिनविरोध विजयी झाले. आता या उमेदवारांबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे या उमेदवारांविरोधात पुरावे असल्याचे सांगण्यात येत आहे. ठाकरे आता कोर्टात जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे ठाणे, कल्याण डोंबिवलीसह राज्यात निवडून आलेल्या 65 महायुतीच्या उमेदवारांच्या विरोधात राज ठाकरे यांच्याकडे पुरावे आहेत. महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचारसभांमध्ये राज ठाकरे बिनविरोधत विजयी झालेल्या उमेदवारांची पोलखोल करणार आहेत.

राज्यभरात काल उमेदवारांना अर्ज माघार घेण्यासाठी नेत्यांनी कॉल करुन दबाव आणल्याचा दावा केला आहे. याबाबत कॉल रेकॉर्ड , व्हिडीओ यांच्यासह अनेक महत्वाचे पुरावे राज ठाकरे यांच्याकडे नेत्यांनी सुपूर्त केले आहेत.

येत्या सोमवारी मनसे या 65 बिनविरोध उमेदवार आणि त्यांच्या जागांबाबत कोर्टात जाणार आहेत. याबाबत मनसे नेते अविनाश जाधव यांनी प्रतिक्रिया दिली. उद्या निवडणूक आयुक्त यांची भेट घेणार आहे. आम्ही ज्या 64 उमेदवारांच्या ठिकाणी ज्या घटना घडल्या आहेत. त्याची माहिती देणार आहे. सोमवारी आम्ही कोर्टात जाणार आहे. नगरसेवकांविरोधात आम्ही कोर्टात जाणार. आधी आम्ही पत्रव्यवहार करणार आहे, असंही जाधव म्हणाले.




## नागपुराच्या अमनची यूपीएससीत भरारी

**नागपूर :** केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) मार्फत घेतली जाणारी अभियांत्रिकी सेवा परीक्षा (Engineering Services Examination – ESE) ही देशातील अत्यंत महत्वाची, कठीण आणि प्रतिष्ठेची परीक्षा मानली जाते. दरवर्षी देशभरातून हजारो गुणवंत अभियांत्रिकी पदवीधर या परीक्षेला सामोरे जातात. या परीक्षेत यश मिळवणाऱ्या उमेदवारांना केंद्र सरकारच्या विविध तांत्रिक, प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय विभागांमध्ये भारतीय अभियांत्रिकी सेवा अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळते. त्यामुळे अभियांत्रिकी क्षेत्रातील तरुणांसाठी ही परीक्षा सर्वोच्च ध्येय मानली जाते.

यूपीएससीने नुकताच अभियांत्रिकी सेवा परीक्षा 2025 (ESE 2025) चा अंतिम निकाल जाहीर केला असून, या निकालात उत्तर नागपूर येथील न्यू ठवरे कॉलनी निवासी अमन शरद गेडाम यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अमन यांनी इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग या विषयात ऑल इंडिया रँक 60 मिळवत नागपूर शहराचा आणि परिसराचा नावलौकिक वाढवला आहे.

अमन गेडाम यांनी नागपूरच्या प्रतिष्ठित विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअरिंग या शाखेत पदवी प्राप्त केली. पदवी शिक्षणादरम्यानच त्यांनी शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करत कॅम्पस प्लेसमेंटद्वारे नोकरी मिळवली. त्यानंतर गेट परीक्षेच्या माध्यमातून त्यांची एनटीपीसी (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन) या सार्वजनिक क्षेत्रातील नामांकित संस्थेत निवड झाली.



एनटीपीसीमध्ये नोकरी करत असताना, शिफ्ट ड्युटी सांभाळून अमन यांनी अत्यंत कठोर परिश्रम, शिस्तबद्ध अभ्यास आणि सातत्याच्या जोरावर ESE परीक्षेची तयारी सुरू ठेवली. काम आणि अभ्यास यांचा समतोल साधत त्यांनी 2025 च्या ESE परीक्षेत हे भरीव यश मिळवले. अमन गेडाम यांचे वडील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ येथून व्यवस्थापक पदावरून सेवानिवृत्त झाले असून आई गृहिणी आहेत. त्यांना केतन नावाचा भाऊ आहे. साध्या कुटुंबातून आलेल्या अमन यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या यशाबद्दल भारतीय दलित पँथर संघटनेच्या वतीने पँथर प्रकाश बन्सोड यांनी अमन गेडाम यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. अमन यांचे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे.

इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विषयात त्यांनी ऑल इंडिया रँक 60 मिळवली आहे. अमन यांनी व्हीएनआयटी नागपूर येथून अभियांत्रिकी पदवी घेतली असून सध्या एनटीपीसीमध्ये कार्यरत आहेत. नोकरी सांभाळत त्यांनी कठोर परिश्रमाने ही परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# 'स्वच्छ शहर'ची घाण

इंदूरच्या नळातून अलीकडच्या दिवसांत पाणी नव्हे, मृत्यू वाहत होता. सातत्याने 'भारताचे सर्वात स्वच्छ शहर' म्हणून गौरविले गेलेले हेच शहर, आज दूषित पाण्यामुळे मृत्यू, रुग्णालये आणि भीतीच्या आकडेवारीने ओळखले जात आहे. हा केवळ अपघात नाही, हा पुरस्कारांवर झोपलेल्या नागरी प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा थेट आणि क्रूर परिणाम आहे. पुरस्कारांचा झगमगाट, नळातील दुर्गंधी इंदूरच्या भागीरथपुरा परिसरात पाण्याला विचित्र चव-वास येतोय, अशी तक्रार नागरिकांनी दिवसेंदिवस केली; पण प्रशासनाने कानांवर हात ठेवले. परिणाम काय? त्याच पाईपलाईनमधून गटारातील जीवाणू मिसळलेले पाणी घराघरांत पोहोचले आणि किमान सात ते दहा नागरिकांचा जीव गेला, शेकडो लोक रुग्णालयात दाखल झाले. जे शहर 'स्वच्छतेच्या' सर्टिफिकेटसाठी पोस्टर्स लावते, त्या शहरात लोकांनी जीव वाचवण्यासाठी नळाचे पाणी उकळून पिण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे, हीच परिस्थितीचे भयावह विधान आहे. 'स्वच्छ शहर' की गटारशहर? ज्या शहराला स्वच्छतेचे राष्ट्रीय पुरस्कार मिळतात, तिथे मुख्य जलवाहिनीच्या वर टॉयलेट बांधलेले आढळते आणि त्यातून गळती होऊन नळाच्या पाण्यात गटार मिसळते. हे केवळ तांत्रिक चुकांचे प्रकरण नाही, हे शहरी नियोजनाच्या शवविच्छेदनाचे प्रकरण आहे. तपासात समोर आलेले 'किलर लॅप्सेस' म्हणजेच जीवघेणे दोष हे दाखवतात की कागदावरील नकाशे, मंजुरी आणि तपासण्या या फक्त फाईल फिरवण्यापुरत्या होत्या, जीव वाचवण्यापुरत्या नव्हत्या. प्रशासनाच्या बचावात दाखवली जाणारी आकडेवारी, किती टँकर पाठवले, किती डॉक्टर फिरत आहेत, किती तपासण्या सुरू आहेत, ही सगळी धावपळ 'घटना घडून गेल्यानंतरची' आहे. खरे प्रश्न असा आहे, लोकांनी पाण्याबद्दल तक्रारी केल्या तेव्हा का दुर्लक्ष झाले? जलवाहिनीवर टॉयलेट बांधण्याइतकी बेदरकार रचना होऊच कशी दिली गेली? कलम 21 - नळातून वाहणाऱ्या हक्काची गळती भारतीय संविधानाचे कलम 21 नागरिकांना जीवनाचा आणि सुरक्षिततेचा हक्क देते आणि न्यायालयांनी या हक्कामध्ये स्वच्छ, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचाही समावेश आहे, असे वेळोवेळी स्पष्ट केले आहे. मध्यप्रदेश उच्च न्यायालयानेसुद्धा इंदूरमधील या पाणी प्रकरणावर तातडीने सुनावणी घेऊन सुरक्षित पाणी आणि उपचारांची हमी देण्याचे आदेश देताना, हा प्रश्न थेट कलम 21 च्या चौकटीत असल्याचे अधोरेखित केले. जेव्हा नागरिकांना नळातून औषध नव्हे, विष मिळते, तेव्हा ही केवळ आरोग्य व्यवस्थेची चूक नसते. ही कलम 21 ची उघडपणे केलेली हत्या असते. उप्पहार अग्नि दुर्घटनेप्रमाणेच, जिथे दिल्ली महानगरपालिकेला निष्काळजीपणाबद्दल जबाबदार धरले गेले, तिथे इंदूर महानगरपालिकेची जबाबदारी काय कमी आहे का? सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट म्हटले आहे की सार्वजनिक सुरक्षेसाठी काम करणाऱ्या प्राधिकरणांवर कडक कर्तव्य आहे आणि ते पार पाडण्यात अपयश आले तर त्यांची जबाबदारी टाळता येत नाही. मग इंदूरमधील मृत्यूंना 'प्राकृतिक' म्हणत आकडे दाबण्याचा प्रयत्न हा कायद्यालाही आणि मानवी विवेकालाही चपराक नाही का? निष्काळजीपणाला शिक्षा, केवळ निलंबन नव्हे घटनेनंतर काही अधिकाऱ्यांचे निलंबन, सेवा समाप्ती, चौकशी समित्या हा सगळा परिचित स्क्रिप्ट आहे. पण जेव्हा गटारातील जीवाणूंनी नळातून घराघरांत मृत्यू पोहोचवला, तेव्हा केवळ शिस्तभंग नव्हे, तर फौजदारी जबाबदारीची भाषा करणे गरजेचे आहे. ज्यांनी नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले. ज्यांनी धोकादायक रचनांना मान्यता दिली. ज्यांनी पायाभूत सुविधांची काळजी न घेता पुरस्कारांच्या बॅनरांमध्ये वेळ घालवला. त्यांच्यावर केवळ विभागीय कारवाई नव्हे, तर न्यायालयीन कसोटीवर उभे करणारी गुन्हेगारी चौकशी होणे आवश्यक आहे. देशभर रस्त्यावरील खड्डे असो, पूल कोसळणे असो, किंवा अशा पाणी दूषितीच्या दुर्घटना न्यायालयांनी वेळोवेळी सांगितले आहे की अशा प्रणालीगत निष्काळजीपणामुळे झालेले मृत्यू हे सरळसरळ कलम 21 चे उल्लंघन आहेत. मग प्रशासनाला फक्त पत्रकार परिषदेत 'दुःख व्यक्त' करून मोकळे होता येणार नाही; जीवितहानी ही जबाबदारीपासून सुटकेचा परवाना नाही. 'स्वच्छ शहर' हा मुखवटा, की शोकपत्र? इंदूरची दुर्घटना ही अपवाद नाही; ती एक इशारा आहे. जेव्हा शहराचे शासन 'स्वच्छतेच्या' मैफलित रमते आणि नळातून काय येत आहे याकडे दुर्लक्ष करते, तेव्हा पुरस्कार फलक आणि शोकसंदेश यांच्यामध्ये फारसा फरक उरत नाही. स्वच्छ शहर असणे हा अभिमानाचा विषय आहे. पण जेव्हा त्या शहरातच स्वच्छ पाण्याचा हक्क वाया जाऊन माणसे मरतात, तेव्हा तो अभिमान नव्हे, तो सबसे मोठा अपराध ठरतो. नागरिकांना आता स्वच्छतेच्या रँकिंगची नाही, तर जिवंत राहण्याच्या हमीची गरज आहे. जो शहर नागरिकांचे मूलभूत जीवन रक्षण करू शकत नाही, तो 'स्वच्छ शहर' या बिरुदामागे लपण्याचा अधिकार गमावतो. शासन म्हणजे पुरस्कार नाहीत. शासन म्हणजे जबाबदारी आणि ज्या दिवशी नळातून पुन्हा एकदा सुरक्षित, निर्मळ पाणी वाहू लागेल, त्याच दिवशी इंदूरला खऱ्या अर्थाने स्वच्छ म्हणण्याचा नैतिक अधिकार आपल्याला परत मिळेल. पुरस्कारांचे चकाकी, प्रशासनाची काळोखी - इंदूर दुर्घटनेतून उघड झालेली 'स्वच्छ शहर'ची घाण भारताच्या 'सर्वात स्वच्छ शहर' इंदूरमध्ये घडलेली अलीकडची दुर्घटना हे केवळ अपघात नव्हे, तर प्रशासनाचे अपरिवर्तनीय अपयशाचे अधिकृत घोषणापत्र आहे. हीच ती शोकांतिका जी सांगते - आपण शहराच्या रँकिंगवर इतके मोहित झालो आहोत की 'जीव व सुरक्षितता' या मूलभूत गोष्टींना आपण विसरलो आहोत. 'स्वच्छता सर्वेक्षण'च्या पुरस्कारांच्या बॅनराखाली जर उघडे नाले, सडलेली नियोजन फाइल्स आणि मृत प्रशासन झाकले जात असेल, तर हा सन्मान नाही, हा लाजेचा विषय आहे. इंदूरचा 'स्वच्छतेत भारतात पहिला क्रमांक' हा खोटा मुखवटा फाटला, तेव्हा समोर आलेली वास्तवता भयावह आहे. जी महानगरपालिका नागरिकांना 'कमी कचरा निर्मिती'चे प्रमाणपत्र देते, तीच प्रशासनिक यंत्रणा सार्वजनिक सुरक्षिततेच्या मूलभूत तत्त्वांवर कोसळलेली दिसते. जिथे जबाबदारी हा शब्द फाईलीत हरवतो, तिथे नागरिकांचे जीव सरकारी दुर्लक्षात संपतात. ही दुर्घटना सांगते, पुरस्कारांनी शहर स्वच्छ दिसू शकते, पण शासनाचे हात रक्ताने माखलेले राहतात. संविधानाचे कलम 21 आपल्याला केवळ जगण्याचा नव्हे, तर सुरक्षित आणि सन्मानाने जगण्याचा हक्क देते. त्यामुळे प्रशासनाने केलेल्या निष्काळजीपणामुळे जर नागरिकांचा मृत्यू होत असेल, तर ते या कलमाचे थेट उल्लंघन आहे. जीवनाचे रक्षण न होणे, हे केवळ व्यवस्थापकीय चूक नाही; हे घटनात्मक पाप आहे. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने "Uphaar Tragedy" आणि "Nilabati Behera" प्रकरणांमध्ये स्पष्ट सांगितले की, शासन आणि त्याची यंत्रणा नागरिकांच्या जीवनासाठी उत्तरदायी आणि दंडनीय आहे. स्वच्छतेच्या पुरस्कारांनी शासनाची जबाबदारी कमी होत नाही. उलट, ती वाढते. कारण 'स्वच्छतेच्या' नावाखाली जेव्हा प्रशासन आत्मरतीत रमते, तेव्हा नाल्याचे झाकण, पूलाची मजबुती, पायाभूत व्यवस्था आणि सुरक्षेची देखरेख मागे पडते. या सर्व निष्काळजीपणामुळे घडलेल्या घटना ही केवळ दुर्घटना नव्हे, तर संस्थात्मक हत्येची परिभाषा आहेत. नागरी स्वराज्य संस्थांचा उद्देश फक्त पुरस्कार मिळवणे नव्हे, तर जीवन-संरक्षणाचे मूलभूत वचन पाळणे आहे. जर नाले, रस्ते, ड्रेनेज आणि सार्वजनिक संरचना नागरिकांसाठी मृत्यूचे सापळे बनत असतील, तर अशा प्रशासनावर केवळ शिस्तभंग नव्हे, तर फौजदारी जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. याचे उत्तर केवळ चौकशी समित्यांमध्ये नाही, तर प्रशासनिक जबाबदारी ठरवणाऱ्या न्यायिक हस्तक्षेपात आहे. सरकार आणि पालिका दोन्हींकडे आता एकच पर्याय शिल्लक आहे. फक्त साफसफाई नव्हे, तर जबाबदारीची धुलाई करा. कारण पुरस्कारांनी मिळणारा 'गौरव' नागरिकांच्या अश्रूंनी आणि मृत्यूमुळे धुलाई करतो, तेव्हा शहराचे सौंदर्य नसते, ते फक्त शवपेटीवरील रंगीत आवरण असते. ■ ■





अॅड. डॉ. सिद्धार्थ कांबळे
मुख्य संपादक

# ग्रेट लीगल ल्यूमिनरी

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिज कंट्रब्यूशन टू लीगल प्रोफेशन अँड एज्युकेशन आगळावेगळा मौलिक ग्रंथ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रकाशन संस्था, मुंबई यांनी प्रकाशित केलेला 'ग्रेट लीगल ल्यूमिनरी'. डॉ बाबासाहेब आंबेडकर हिज कंट्रब्यूशन टू लीगल प्रोफेशन अँड एज्युकेशन. हा आगळा वेगळा इंग्रजी ग्रंथ आहे ज्याचे मराठी भाषेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदे व्यवसाय आणि कायदे शिक्षणातील योगदान असे नाव होईल. डॉ. यशवंत चावरे सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांनी लिहिलेले हा ग्रंथ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा क्षेत्रात केलेली कामगिरी अर्थात त्यांनी न्यायालयात ज्या केसेसमध्ये वकिली केली. त्या केसेसची फाईल या ग्रंथात आहे. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विधी शिक्षणासाठी केलेले कार्य, ते विधी महाविद्यालयात प्राध्यापक होते. याची सविस्तर माहिती या ग्रंथात आहे. या शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले अर्ज, त्यांनी मिळविलेली सनद असे महत्वाचे दस्तऐवज या ग्रंथात आहे. हे ग्रंथ दोन खंडात आहेत. या ग्रंथाला भारताचे सर्वोच्य न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई यांची प्रस्तावना आहे. डॉ. चावरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विधी क्षेत्रात केलेल्या कार्याची माहिती अत्यंत चिकाटीने जमा केली आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व भारतीय संविधानापुरते मर्यादित न राहता, एक उच्चकोटीचे विधिज्ञ, कुशल वकील आणि कायद्याच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवणारे क्रांतिकारक म्हणून समजून घेण्यास मदत होते. ही दृष्टी देणारा आणि त्या दृष्टीला ठोस, न्यायालयीन दस्तऐवजांचा आधार देणारा ग्रंथ म्हणजे ग्रेट लीगल ल्यूमिनरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिज कंट्रब्यूशन टू लीगल प्रोफेशन अँड एज्युकेशन हा डॉ. यशवंत चावरे यांचा मौलिक व संशोधनात्मक प्रकल्प होय. हा ग्रंथ गौरवपर लेखन न करता न्यायिक साक्ष, ऐतिहासिक पुरावे आणि केस-लॉच्या चौकटीतून डॉ. बाबासाहेबांचा विधी इतिहास मांडतो, हीच त्याची सर्वात मोठी ताकद आहे.




या ग्रंथाला लाभलेली न्या. भूषण गवई यांची प्रस्तावना ही केवळ प्रशंसात्मक नसून न्यायालयीन पातळीवरून दिलेली बौद्धिक आणि नैतिक मान्यता आहे. प्रस्तावनेचा मध्यवर्ती आशय स्पष्ट आहे. डॉ. आंबेडकरांचे वकिलीतील कौशल्य, न्यायालयीन कामकाज आणि कायदे शिक्षणाविषयीचे योगदान आजही अभ्यासक्रम, संशोधन आणि विधी चर्चेत अपेक्षित स्थान मिळवू शकलेले नाही. ही ऐतिहासिक उणीव भरून काढण्याचे कार्य हा ग्रंथ करतो, असा ठाम न्यायिक निर्वाळा न्या. भूषण गवई यांच्या प्रस्तावनेतून व्यक्त होतो. त्यामुळेच या ग्रंथाला विलक्षण विश्वासार्हता आणि शैक्षणिक अधिष्ठान प्राप्त होते. लेखकाच्या मनोगतातून हा ग्रंथ कसा घडला याची तपश्चर्या उलगडते. जुन्या न्यायालयीन नोंदी, नागरी व फौजदारी खटल्यांची कागदपत्रे, आदेश, साक्षी, युक्तिवाद, पत्रव्यवहार हे सर्व संकलित करून त्यांचे शिस्तबद्ध विश्लेषण करणे हे अत्यंत कष्टाचे, वेळखाऊ आणि तांत्रिक कार्य होते. न्यायाधीश म्हणून अंगीकारलेली शिस्त आणि संशोधक म्हणून प्रामाणिकपणा यामुळे लेखकाने कुठेही भावनेला पुराव्यापेक्षावरचे स्थान दिलेले नाही. ही भूमिका या ग्रंथाच्या वैज्ञानिक आणि अकादमिक मूल्याची हमी देतेय. ग्रेट लीगल ल्यूमिनरी हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या न्यायालयीन जीवनाचा, कायदेव्यवसायाचा आणि विधीविचारांचा सखोल, दस्तऐवजाधारित इतिहास मांडतो. उपसंहार आणि प्रस्तावनेनंतर ग्रंथाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या बॅरिस्टर म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या रोलवर झालेल्या नोंदणीपासून होते. करवीर संस्थानाकडून प्राप्त वकिली सनद, तसेच कायदे व्यवसायातील त्यांचे योगदान या प्रारंभिक प्रकरणांतून त्यांच्या विधी कारकिर्दीची भक्कम पायाभरणी स्पष्ट होते. यानंतर लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हाताळलेल्या महत्त्वाच्या प्रकरणांचा तपशीलवार आढावा घेतात. 'देशाचे दुश्मन प्रकरण' आणि रघुनाथ धोंडो कर्वे प्रकरण या खटल्यांमधून त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक सुधारणांबाबतची निर्भीड भूमिका आणि कायदेशीर तर्कशक्ती अधोरेखित होते. कायदे शिक्षणातील योगदान या प्रकरणात डॉ. आंबेडकर यांची विधी शिक्षणाला सामाजिक न्यायाशी जोडणारी दृष्टी स्पष्ट केली आहे.

गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, मुंबई येथे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून त्यांनी बजावलेली भूमिका, अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांमध्ये विधीविचार रुजवण्याचे कार्य स्वतंत्र प्रकरणात नोंदवले आहे. त्यानंतर महाड चवदार तळे प्रकरण या ऐतिहासिक दिवाणी खटल्याचा सविस्तर न्यायालयीन अभ्यास आहे. हा खटला सामाजिक आंदोलनापुरता मर्यादित न राहता नागरी हक्कांचा कायदेशीर लढा कसा ठरला, हे दाखवणारे हे प्रकरण ग्रंथाचा केंद्रबिंदू आहे. बैल पोल फेस्टिव्हल प्रकरणातील अपील, तसेच मुंबई उच्च न्यायालयात चालवलेली विविध दिवाणी अपिले आणि अंतिम आदेश (Final Decree Proceedings) यांमधून डॉ. आंबेडकरांची प्रक्रिया-विषयक पकड, पुराव्यांचे मूल्यमापन आणि न्यायालयीन धोरण स्पष्ट होते. सर्वोच्च न्यायालयात चालवलेल्या दिवाणी अपिलांमुळे त्यांच्या विधी कार्याचा राष्ट्रीय पातळीवरील विस्तार अधोरेखित होतो. ग्रंथ खंड 1 च उत्तरार्ध फौजदारी खटल्यांवर केंद्रित आहे. सत्र न्यायालय खटला क्र. 41/1926 -सम्राट विरुद्ध मेट्स ॲल्स डिब्री व इतर, सत्र खटला क्र. 52/1936 सम्राट विरुद्ध बदाम खान व इतर (गोरेगाव खून प्रकरण), तसेच सत्र खटला क्र. 3/1929 - सम्राट विरुद्ध दाजी बाबू पवार व इतर (वराडकर खून प्रकरण, कुंकवले माळवण) या गंभीर खटल्यांमधून डॉ. आंबेडकरांची फौजदारी कायद्यातील प्रभुत्व सिद्ध होते. यासोबतच फौजदारी पुनर्विचार अर्ज क्र. 69/1941 अल्ला दत्ता विरुद्ध सम्राट, मुंबई उच्च न्यायालयापुढे चालवलेली फौजदारी अपिले आणि सर्वोच्च न्यायालयापुढे चालवलेली फौजदारी अपिले या सर्व प्रकरणांमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ समाजसुधारक नव्हे, तर अत्यंत सक्षम, शिस्तबद्ध आणि तत्त्वनिष्ठ फौजदारी वकील होते, हे ठामपणे समोर येते. परिशिष्टांमधील दस्तऐवज, नोंदी आणि संदर्भांमुळे हा खंड केवळ ऐतिहासिक कथन न राहता न्यायालयीन पुराव्यांवर उभा असलेला विधीइतिहास ठरतो. त्यामुळे ग्रंथ हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानपूर्व न्यायालयीन लढ्यांचा, कायद्याच्या माध्यमातून सामाजिक न्याय साध्य करण्याच्या प्रयत्नांचा आणि भारतीय विधी परंपरेतील त्यांच्या अद्वितीय स्थानाचा सर्वांगीण दस्तऐवज ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या न्यायालयीन जीवनाचा कालानुक्रमिक, सुसंगत आणि सखोल आढावा घेतला आहे. बॅरिस्टर म्हणून नोंदणीपासून मुंबई उच्च न्यायालयातील खटले, सत्र व जिल्हा न्यायालयातील प्रकरणे, नागरी व फौजदारी खटले, तसेच महाड-चवदार तळे प्रकरणातील युक्तिवादांच्या नोंदी, या सर्व बाबी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेबांना 'न्यायालयातील रणांगणात लढणारा विधीयोद्धा' म्हणून उभे करतात. विशेषत: युक्तिवादांच्या नोंदींमधून त्यांच्या तर्कशुद्धतेचा, घटनात्मक जाणिवेचा आणि सामाजिक न्यायाच्या स्पष्ट दिशादर्शनाचा उगम दिसून येतो. वकिलांना आपली केस कशी मांडावी याचा बोध या ग्रंथातून होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वकिली कौशल्याचे अनेक पैलू या ग्रंथातून प्रकर्षाने समोर येतात. त्यातील एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे दिनकरराव जवळकर आणि जेधे यांच्यावरील मानहानीचा खटला. या प्रकरणात असा आरोप करण्यात आला होता की जवळकर व जेधे यांनी लोकमान्य टिळक आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची मानहानी केली आहे. या खटल्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अवघ्या पाच ते दहा मिनिटांचा संक्षिप्त पण निर्णायक युक्तिवाद केला आणि तोच युक्तिवाद प्रकरण जिंकून देणारा ठरला. डॉ. बाबासाहेबांनी न्यायालयात मांडलेला मुद्दा अत्यंत मूलभूत पण कायदेशीरदृष्ट्या निर्णायक होता, ज्यांची मानहानी झाल्याचा आरोप आहे, ती व्यक्ती न्यायालयात उपस्थितच नाहीत, त्यांनी स्वत: बदनामी झाल्याचा दावा केलेलाच नाही. अशा परिस्थितीत तक्रार दाखल करणाऱ्यांना लोकस स्टँडिं नाही. या एकाच मुद्द्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण प्रकरण जवळकर यांच्या बाजूने वळवले. हा प्रसंग त्यांच्या कायदेशीर तर्कशुद्धतेचा आणि मुद्देसूद युक्तिवादाचा उत्कृष्ट नमुना आहे. दिनकरराव जवळकर यांचे सामाजिक योगदानही येथे उल्लेखनीय आहे. 1927 च्या महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या वेळी त्यांनी आपल्या मराठा बांधवांची बैठक घेऊन महाड येथील अस्पृश्य समाजाच्या सत्याग्रहला उघड पाठिंबा जाहीर केला होता. सामाजिक न्यायाच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जवळकर यांची ही वैचारिक जवळीकही या पार्श्वभूमीवर लक्षात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वकिलीतील एक मूलभूत नैतिक भूमिका म्हणजे, व्यक्तीचे चारित्र्य नव्हे, तर तिच्यावर झालेला अन्याय महत्त्वाचा असतो. एखादी व्यक्ती चारित्र्याने परिपूर्ण नसेल, तरी तिच्यावर अन्याय होत असेल तर तिला न्याय मिळवून देणे हे वकिलाचे कर्तव्य आहे, अशी त्यांची ठाम भूमिका होती. याचे बोलके उदाहरण म्हणजे मुंबईतील वेश्यांना त्यांनी दिलेला सल्ला, 'हा धंदा सोडा, स्वाभिमानाने आणि कष्टाने जीवन जगण्याचा मार्ग निवडा.' उपजिविकेचे साधन शुद्ध असावे, असा त्यांचा आग्रह होता. मात्र, कुंटणखान्याच्या मालकीणवर अन्याय झाला म्हणून जेव्हा तिच्यावर केस झाली, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तिचे वकीलपत्र स्वीकारले. व्यक्ती कोण आहे यापेक्षा अन्याय कुठे आहे, हे त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाचे होते. आपल्या प्रकरणांबाबत डॉ. बाबासाहेबांचा आत्मविश्वास विलक्षण होता. ठाण्याच्या न्यायालयातील एका खुनाच्या खटल्यात अंतिम युक्तिवादाच्या दिवशीच त्यांना सायमन कमिशनसमोर साक्ष द्यायला जाणे आवश्यक होते. त्यांनी न्यायालयाला विनंती केली की, सरकारी पक्षाआधी त्यांचा युक्तिवाद ऐकून घ्यावा. सामान्यत: आधी सरकारी पक्षाचा आणि नंतर आरोपीचा युक्तिवाद होतो; मात्र वेळेच्या मर्यादेमुळे न्यायालयाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विनंती मान्य केली. डॉ. बाबासाहेबांनी युक्तिवाद केला आणि थेट सायमन कमिशनसमोर साक्ष देण्यासाठी निघून गेले. निकाल लागला, आरोपी निर्दोष सुटला. साध्या केसेसमध्येही वकिलांना निकालाबाबत चिंता असते, शिक्षेची शक्यता धरून जामिनाचा अर्ज तयार ठेवला जातो; पण डॉ. बाबासाहेबांचा आत्मविश्वास इतका ठाम होता की त्यांनी सरकारी पक्षाचा युक्तिवाद ऐकण्याआधीच न्यायालय सोडले. या ग्रंथातून अशा प्रसंगांमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वकिली कौशल्याचा सखोल अभ्यास करता येतो. महत्त्वाची बाब म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये प्राध्यापक होते आणि काही काळ प्राचार्यही होते. जवळजवळ दहा वर्षे त्यांनी तेथे अध्यापन केले. मोठे व अवघड सिद्धांत विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगत. हे शिक्षण कौशल्य होते. या काळात त्यांनी विद्यापीठ आणि महाविद्यालयाला दिलेल्या सूचनांचा आजही मोठा शैक्षणिक अर्थ आहे. त्या काळी एलएलबीचा अभ्यासक्रम अर्धवेळ (Part-time) होता; तो पूर्णवेळ (Full-time) करावा, अशी त्यांनी ठाम शिफारस केली. आज अस्तित्वात असलेल्या पाच वर्षांच्या विधी अभ्यासक्रमासारखी रचना त्या काळातच त्यांनी सुचवली होती. तर्कशास्त्र आणि मानसशास्त्र हे विषय विधी शिक्षणात समाविष्ट करावेत, असे त्यांचे मत होते. एवढेच नव्हे, तर ग्रंथालय कसे असावे, त्याची रचना कशी असावी, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले असल्याचे या ग्रंथातून दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कधीही आपल्या पक्षकारांकडे फीबाबत तगादा लावल्याचे उदाहरण आढळत नाही. हा गुण आजच्या काळातही आदर्श मानावा असा आहे. वकिली करताना उलट तपासणी (Cross-examination) हे एक स्वतंत्र कौशल्य असते, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अत्यंत प्रभावीपणे अवगत होते. या ग्रंथातून उलट तपासणी कशी करायची, प्रश्न कसे विचारायचे, साक्षीदाराला सत्याकडे कसे आणायचे. याचे अत्यंत उद्बोधक मार्गदर्शन वकिलांना मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या पक्षकारांशी नेहमी प्रामाणिक असत. एखाद्या प्रकरणात दम नसेल, तर ते स्पष्टपणे पक्षकाराला सांगत, 'पुढे जाऊ नकोस.' कर्नाटकातील एका प्रकरणात, कर्नाटक उच्च न्यायालयात प्रतिकूल निकाल लागल्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी त्या पक्षकाराला सर्वोच्च न्यायालयात जाऊ नये, असा सल्ला दिला होता. पण पक्षकाराने आग्रह धरल्यामुळे डॉ. बाबासाहेबांना सुप्रीम कोर्टात केस दाखल करावी लागली. निकाल पुन्हा त्या पक्षकाराच्या विरोधात गेला. तेव्हा डॉ. बाबासाहेबांनी शांतपणे सांगितले, 'मी तुला आधीच सांगितले होते.' अशा असंख्य उदाहरणांतून या ग्रंथामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ महान समाजसुधारक किंवा संविधानकारच नव्हे, तर उच्च दर्जाचे, नैतिक, तत्त्वनिष्ठ आणि अत्यंत कुशल वकील होते, हे ठळकपणे समोर येते. खंड 2 हा अधिक तांत्रिक, अधिक सखोल आणि कायदे शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. साक्षीदार म्हणून डॉ. बाबासाहेबांची भूमिका, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील अपिले, महाड चवदार तळे प्रकरणातील संपूर्ण न्यायालयीन नोंदी, परिशिष्टे, प्रकरणांची सूची आणि ग्रंथसूची यांमुळे डॉ. बाबासाहेबांचा अभ्यास इतिहासापुरता मर्यादित न राहता केस-लॉ म्हणून करता येतो. हा खंड कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष न्यायालयीन व्यवहार समजून घेण्याचे प्रभावी साधन ठरेल. दोन्ही खंडांचा कणा ठरणारे महाड चवदार तळे प्रकरण हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. दावा अर्ज, प्रतिवाद, आदेश, अपिले आणि निकाल सर्व काही मूळ न्यायालयीन कागदपत्रांच्या आधारे मांडलेले असल्यामुळे महाड सत्याग्रह हा केवळ सामाजिक आंदोलन नसून नागरी हक्कांचा कायदेशीर आणि घटनात्मक लढा होता, हे निर्विवादपणे स्पष्ट होते. या खटल्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाजूने उभे राहिलेले साक्षदार शंकराचार्य कुर्तकोटी, वी. दा. सावरकर यांचे भाऊ रामभाऊ सावरकर, ब्राम्हण संस्कृत पंडित पालेय शास्त्री यांची साक्ष म्हणजे सरतपास ज्याला एक्झामिनेशन इन चीफ म्हणतात, तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कसा रेकॉर्डवर आणला आणि आपली केस मजबूत केली हे खरे तर अग्निदिव्य आहे. पाण्याला अस्पृश्यांनी स्पर्श करू नये असे आमच्या मूळ हिंदू शास्त्रात लिहिले नाही. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या ब्राम्हण संस्कृत पंडित साक्षदारांनी सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना किती मोठा दिलासा दिला! तेव्हा भारतीय संविधान नव्हते, तर रूढी परंपराचे निर्णय ब्राम्हण पंडित यांच्या सांगण्यानुसार न्यायालय स्वीकारत असे. सर्व दस्तऐवजीकरणामुळे भारतीय सामाजिक इतिहासाला न्यायालयीन पुराव्यांच्या प्रकाशात नव्याने मांडण्याची संधी मिळते. कायदे शिक्षण व न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने हा ग्रंथ मूलभूत संदर्भग्रंथ ठरतो. तो केवळ माहिती देत नाही, तर न्यायालयीन भाषा, युक्तिवादाची शिस्त, पुराव्यांचे महत्त्व आणि सामाजिक न्यायाचा कायदेशीर वापर कसा करायचा हे शिकवतो. एल एल बी आणि विधी शिक्षणाचे विद्यार्थी, न्यायिक प्रशिक्षण संस्था, पोलिस ट्रेनिंग केंद्र, सरकारी वकिलांचे कार्यालय, वकील, न्यायाधीश आणि संशोधक या सर्वांसाठी हा ग्रंथ उपायुक्त आहे. बार असोसिएशन किंवा विधी महाविद्यालयांची वाचनालये असोत किंवा सार्वजनिक वाचनालये असो या ग्रंथाच्या समावेशामुळे त्यांच्या वाचनसंपदेची केवळ संख्या नव्हे, तर बौद्धिक उंची निश्चितच वाढेल. अर्थात, 'न्यायालये, बार असोसिएशन्स आणि विधी महाविद्यालयांची वाचनालये या सर्व ठिकाणी या ग्रंथाची उपस्थिती त्या वाचनालयांच्या बौद्धिक आणि शैक्षणिक उंचीत मोलाची भर घालणारी ठरेल.' एकूण मूल्यमापन करता, ग्रेट लीगल ल्यूमिनरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा 'संविधानाच्या आधी न्यायालयात घडलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा इतिहास' आहे. न्या. भूषण गवई यांची प्रस्तावना या ग्रंथाला न्यायिक अधिष्ठान देते, लेखकाचे मनोगत संशोधनाची तपश्चर्या उलगडते आणि विस्तृत अनुक्रमणिका या ग्रंथाच्या प्रचंड व्याप्तीची साक्ष देते. हा ग्रंथ गौरवग्रंथ नाही, भावनिक चरित्र नाही, तर न्यायालयीन दस्तऐवजांवर आधारित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विधीइतिहास आहे. हा ग्रंथ वाचण्यासाठी नव्हे, तर अभ्यासासाठी, संदर्भासाठी आणि न्यायासाठी वापरण्यासाठी आहे. असा ग्रंथ लिहिणे म्हणजे इतिहासाशी प्रामाणिक राहण्याची आणि पुढील पिढ्यांसाठी सत्य जपण्याची धाडसी बौद्धिक कृती होय. यासाठी डॉ. यशवंत चावरे यांचे मन:पूर्वक अभिनंदन. हा ग्रंथ दोन खंडात आहे खंड 1 पृष्ठ चे 644 आणि खंड 2 चे पृष्ठ 614 आहेत. हा ग्रंथ मिळविण्यासाठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रकाशन संस्था 1101, श्री स्मरण सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सेक्टर 11, फेज 1, तळोजा, नवी मुंबई. डॉ. यशवंत चावरे, मो.9420212827
संपर्क करा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विधी क्षेत्रातील कार्य देशासमोर उजागर केले त्या साठी आमचे मित्र न्या. डॉ. यशवंत चावरे सेवानिवृत्त न्यायाधीश यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो! त्यांच्या पुढील लेखनास शूभेच्छा ! ■ ■


अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

# हिंदू राष्ट्र निर्मितीचे नाव घेऊन ब्राम्हणांनी हुकूमशाही लादली!

आजकोणताही शासक सांगून हुकूमशहा होत नसतो. तो लोकशाहीचे आणि लोक कल्याणाचे ढोंग करतो. त्या प्रमाणे काही काळ पाऊले टाकून लोकांचा विश्वास संपादन करतो. त्या नंतर भ्रम निर्माण करीत चोर पावलाने हुकूमशाही आणतो. हुकूमशाहीचा जाच एका वेळी सर्वांना होणार नाही याची तो काळजी घेतो.

**दोन उद्योगपती अर्थ व्यवस्थेचे मालक :-** देशातील अतिश्रीमंत उद्योगपतीना आणि प्रतिगामी लुटारू प्रस्थापितांना विश्वासात घेतो. त्याला लाभ होईल असे धोरण अवलंबिले जाते. त्यामुळे उद्योगपती सत्तेला मजबूत करण्याचा वाट्टेल तो प्रयत्न करतात.

**वृत माध्यम एककल्ली :-** प्रसारणाची माध्यमे पैशाचे जोरावर आपल्या बाजूने सत्ताधारी करतात. किंबहुना ती उद्योगपतींची असतात. प्रसार माध्यमे सत्ताधारी नेत्यांचे अतिरंजीत गौरविकरण करण्याचे धोरण अवलंबितात. विरोधी पक्ष कसा बदनाम होईल याची जणू काही सुपारी घेऊन लिखाण करतात. तसेच दूरदर्शनवर प्रसारित करतात. त्याला नको तेवढे बदनाम करणारे लिखाण करतात. तसेच बातम्या प्रसिद्ध करतात.

**गुंडांना सरकारी अभय :-** देशातील संघठित गुन्हेगारी करणारे माफिया सरकारचे करीता काम करतात. समाजात दहशत निर्माण करण्याचे काम सरकार त्यांचे मार्फत करीत असतात. जे सरकारी पक्षाचे ऐकत नाहीत त्यांना तुरुंगात टाकले जाते किंवा मारून टाकले जाते.

**विरोधी पक्ष नष्ट करण्याचे षडयंत्र :-** विरोधी पक्षाचे कमजोर नेते लालुच दाखऊन सुरुवातीस सत्ताधारी पक्षात सामील करून प्रतिष्ठित केले जातात. त्यांचे कडून विरोधी पक्ष नेते आणि कार्यकर्ते फोडण्यात येतात. विरोधी पक्षाचे जे नेते सहज सत्ताधारी पक्षाच्या सोबत येत नसतील त्यांना कायद्याच्या जाळ्यात अडकवले जाते. तुरुंगात जाण्याचे भीतीने त्यांना फोडण्यात येते. त्यामुळे विरोधी पक्षावर लोकांचा विश्वास रहात नाही. त्या पक्षाची ते ताकद कमी करीत आणतात. अशाप्रकारे विरोधी पक्ष नष्ट झाल्यागत दिसतो. देश विरोधी सरकारी धोरणा विरुद्ध बोलेल असा कुणी मोठा विरोधी पक्ष नसल्याने वाट्टेल ते लोकविरोधी निर्णय घेण्याची सुरुवात देशात झालेली असते. कारण मिडिया, मनी आणि माफिया हे सत्ताधारी पक्षाच्या वतीने काम करीत असतात. त्यामुळे सत्तेला कुणाचाच धाक राहिलेला नसतो. लोक भ्रमजालात मदमस्त झालेले असतात. विचार करणारे निराधार झालेले असतात. बोलणारे कमजोर झाले असतात. काहींना मारले जाते. काहीना धमकावले जाते. दोन नेते व दोन उद्योगपती देश चालवतात, देशाची सत्ता निवडून आलेल्या मोठ्या पक्षाजवळ नाममात्र असते. सत्ता सरकारचे मंत्रीमंडळाजवळ देखील नसते. त्यातील दोघांजवळ सत्ता असते. त्याचे विरोधात जाण्याची हिंमत कोणत्याही मंत्र्यात नसते. कारण एकतर ते बहिष्कृत होण्याची भीती असते किंवा मारल्या जाण्याची तरी असते. मंत्री दहशतीत असतात.

**गुलामी कशी लादल्या जाते? :-** दोन उद्योगपती अर्थव्यवस्थेचे चालक झालेले असते. अजून हा खेळ असाच काही काळ चालेल. लोकांना हे वातावरण सहन करण्याची सवय होईपर्यंत हे असेच चालेल. सवय झाली की शिक्षण घेण्याचा अधिकार काढून घेतला जातो. त्यानंतर शिक्षण थोड्या मूठभर लोकांच्यासाठी राखून ठेवण्यात आलेले असते. कष्टकरी, कामगार, मजूर, शेतकरी, कर्मचारी यांना कामचलाऊ शिक्षण देण्याची सुरुवात झाली असते आणि बेसिक शिक्षण सत्ताधारी जमातीस राखीव ठेवल्या जाते. अज्ञान, गरिबी, धर्मांधता, जातीयता, अराजकता माजली की हुकूमशाही त्यावर उभी झालेली असते. नंतर सुरू होतो लोकांचा छळ. तो मुकाट्याने सहन करावा जागतो. तिथे हिटलरसारखी हुकूमशाही पूर्ण रुपात जन्मास येते. त्याचे समर्थन करणारी देखील भ्रमिष्ट जनता असते. अशा




प्रकारे लोकशाही नाममात्र देखव्यासाठी असते. वास्तवात हुकूमशाही प्रस्थापित झालेली असते. आज भारत त्याच दिशेने वाटचाल करीत आहे. देश ब्राम्हणी गुलामीत आला आहे.

**लोक जागृत होऊ नये असा प्रयत्न :-** आज सर्वसामान्य लोकांना ही जाणीव का होताना दिसत नाही? हा सर्वांना प्रश्न पडेल. ही जाणीव न होण्याचे कारण म्हणजे लोकांनी संघटित विरोध करू नये म्हणून हुकूमशाहीचे चटके मंद-मंद गतीने, सुसह्य होईल असे देण्यात येतात. ते सहन होणारे असल्याने त्या विरुद्ध लढणारा वर्ग निर्माण होत नाही. ज्याला कळते तो ते सांगत जरी असला तरी त्याचेवर सर्वसामान्य लोक विश्वास ठेवत नाही. त्यांचे सांगणे काही दिवसांनी बोथड होते. हळू हळू चटके वाढत जातात. हे चटके कळणारे लोक देखील तयार होतात. 'पुढे पाठ, मागे सपाट' असे जागृत लोकांच्या संख्येबाबत होत राहते. ही प्रक्रिया सतत सुरू राहते. त्यामुळे हुकूमशाही विरुद्ध संघटित विद्रोह निर्माण होत नाही. एक दिवस असा येतो की आपण गुलाम केव्हा झालो हे कुणाला कळत नाही.

**गुलामी हळू हळू जाणवेल :-** आज वर्तमान काळात भारताने गुलामीत प्रवेश केला आहे. असाच मंद-मंद गतीने अगदी चोर पावलाने.

**निवडणुकीचा केवळ देखावा :-** निवडणूक नाममात्र झालेली आहे. EVM मुळे कोण कोणाला मत देत आहे याचा ज्याचा त्याला देखील विश्वास वाटत नाही. गरीब कार्यकर्ता निवडणूक शर्यतीत कधीच उतरू शकत नाही. जातीयता असल्यामुळे पिडीत जातीचे लोक आणि अल्पसंख्य लोक निवडून येण्याची शक्यता नसते. त्यामुळे लाचार आणि दलाल तयार होतात. ते गुलाम असतात, पण गुलामीत आनंद मानणारे असतात. ते लढण्याचे विरोधात असतात. ते हुकूमशाही व्यवस्थेचे समर्थन करणारे असतात.

**निवडणूक आयोगाची स्वायत्तता नष्ट झाली :-** निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था असताना तो सरकारचा पोपट झाला. ही जाणीव सर्वसामान्य लोकांना असण्याची गरज वाटत नाही. कारण त्याची झड त्याला बसत नाही.

**मीडिया हुकूमशाही बळकट करीत आहे :-** आता भारतीय मीडिया आज गोदी मीडिया झाला आहे. मोदींचा जयजयकार करणे हीच भूमिका आज मीडियाने स्वीकारली आहे. जणू काही भारतीय मीडिया मोदींनी खरेदी केला आहे. केवळ भाटगिरी करणे येवढेच काम मीडियाने स्वीकारले आहे. ही गुलामगिरीची खूण आहे.

**विरोधी पक्ष नष्ट करण्यात आला :-** विरोधी पक्ष जाणीवपूर्वक नष्ट करणे हे लोकशाही विरुद्ध दुष्कृत्य मोदी सरकारने केले आहे. हुकूमशाही मध्ये सरकारला विरोध करणारे अपेक्षित नसतात. मोदी सरकारने देशातील विरोधी पक्ष कसा नष्ट होईल अशी पावले टाकलीत. लोकांनी निवडून दिलेल्या राज्य सरकारांना धन बळ आणि तुरुंगात जाण्याची भीती दाखऊन पाडण्यात आले. भ्रष्टाचाराचे आरोप आपणच करायचे आणि आपणच त्यांना आपल्या पक्षात घेऊन त्यांना मंत्री करायचे हे लक्षण म्हणजे विरोधी पक्ष नष्ट करण्याचे आहे. लोकशाहीमध्ये सरकारला अनिर्बंध अधिकार मिळू नयेत म्हणून संसदेत किंवा विधान सभेत विरोधी पक्ष सरकारी चुकीच्या धोरणाचा विरोध करीत असतो. आज विरोधी पक्ष ज्या पद्धतीने नष्ट केल्या गेला ती पद्धती हुकूमशाही मध्येच असू शकते.

**धर्म निरपेक्षता नष्ट झाली :-** धर्मनिरपेक्षता हे तत्त्व लोकशाहीने स्वीकारले असते. सध्या सरकार हिंदू राष्ट्र निर्माण झाल्याची घोषणा करते आहे. एका धर्माचा देश होणे म्हणजे हिंदू सोडून इतर धर्माचे लोकांना जबरदस्तीने हिंदू धर्म स्वीकारण्याचे बंधन टाकणे होय. हीच हुकूमशाहीची ओळख आहे.

लेखांक १४०


अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

**ज्ञान बंदी सुरू झाली आहे :-** शिक्षण घेऊन माणूस बुद्धीमान होत असतो. तो कोणत्याही पावलाची समीक्षा करीत असतो. लोकशाहीत सरकार शिक्षण देत असते. हुकूमशाही मात्र गुलामांना ज्ञान देण्याचे नाकारतात. त्यामुळे तो निर्बुद्ध होतो. तो समीक्षा करू शकत नाही. तो गुलामी विरुद्ध बंड करू शकत नाही. म्हणून केवळ सत्ताधारी लोकच शिक्षण घेतील अशी व्यवस्था हुकूमशाहित केली असते. आज मोदी सरकारने शिक्षण जवळजवळ बंद केले आहे. नवीन शिक्षानीतीचा वाईट परिणाम लवकरच देशातील लोकांना पाहायला मिळेल. सुरुवातीला जो शिक्षण विकत घेऊ शकेल तोच शिकू शकेल. नंतर मागास लोकांना आणि महिलांना सरसकट शिक्षण बंदी घातली जाईल. ही हुकूमशाहीची ओळख आहे.

**अराजक निर्माण करण्यात आले :-** अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न हुकूमशहा करीत असतो. मोदी सरकारने जातीजातीत, धर्माधर्मात जो कलह, शत्रुत्व निर्माण केले त्यामुळे सर्वत्र दहशतीचे वातावरण तयार झाले आहे. झुंड बळी, अंधश्रद्धा, स्त्री ला दुर्बल करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करणे हे अराजकता निर्माण करण्याचे प्रयत्न असून ती हुकूमशाहीची ओळख आहे.

**संविधान बाद केले आहे :-** हुकूमशहा लोकशाही संविधान मानत नसतो. तो धर्मशास्त्र (मनुस्मृती) हे संविधान मानतो. किंवा तो म्हणेल तोच कायदा होतो. तो लोकांनी निवडून दिलेली संसद मानत नाही तो बुवा-बाबा या जोगळ्याची धर्म संसद अपेक्षित करीत असतो. आज 2014 नंतरचे सरकार लोकशाही संविधान नाकारते. त्यासाठीच त्यांनी 400 पेक्षा जास्त खासदार निवडून द्या असे आवाहन त्यांनी 2019 च्या लोकसभा निवडणुकीत हिंदूंना केले होते. ही हुकूमशाही राज्य व्यवस्थेची मोठी खूण आहे.

**स्वातंत्र्यासाठी लढ्याची सुरुवात करावी लागेल :-** म्हणून सुज्ञ, अभ्यासू, विचारवंत, संवेदनशिल लोकांवर आज मोठी जबाबदारी आलेली आहे. ज्यांना हे निरीक्षण करता येत नाही त्या सर्वसामान्य बहुसंख्य लोकांना ही गुलामीची जाणिव करून देण्याची जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. तो आपल्या स्वातंत्र्याचा लढा असेल. आता आपण किती वर्षे गुलामीत राहायचे येवढाच निर्णय जनतेला घ्यावा लागेल. म्हणून स्वातंत्र्य युद्ध देशात कधी सुरू होईल हे सांगता येत नाही. हुकूमशाही विरुद्ध संघटित लोक लढा लढणे येवढाच पर्याय शिल्लक आहे. ■ ■

# जयभीम सलामीची सिंहगर्जना

**भीमा कोरेगाव एक युद्धस्थान नाही तर शौर्य आत्मसम्मान आणि अन्यायाला 500 महारानी दिलेले रोखठोक ठाम उत्तर होते त्या अमर बलिदानाच्या शोर्य स्तंभास विविध राज्यातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भीम अनुयायांनी उपस्थित राहून अभिवादन केले. हा शिस्तबद्ध सोहळा पाहून आपल्या शूरवीर पूर्वजांच्या पराक्रमाची आठवण होते खरे तर इतिहास निर्माण करावा लागतो. येथिल ही काही काल्पनिक घटना किंवा दंतकथा नाही तर 1 जानेवारी 1818 चे युद्धसंग्राम प्रसंग आहे जो ब्रिटिश राजवटीने कोरून ठेवला आहे.**

भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्यदिनी अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो भिम अनुयायांनी आपल्या पुवर्जाच्या महार सैनिकांच्या शौर्याला मानवंदना दिली. 1 जानेवारी 1927 साली महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ऐतिहासिक विजयस्तंभास मानवंदना दिली. त्यानंतर 1 जानेवारी रोजी लाखो भीमसैनिक अभिवादन करण्यास आले.

1 जानेवारी रोजी 208 वा शौर्यदिन उत्साहात आणि अभुतपूर्व गर्दीत साजरा झाला. ऐतिहासिक विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी देशभराती लाखो भीमअनुयायी आदल्या दिवशीच्या रात्रीपासून भीमाकोरेगावमध्ये दाखल झाले होते. डॉ. बाबासाहेबांचा जयघोष आणि निळ्या झेंड्याच्या साक्षीने परिसरात चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते. दरवर्षी प्रमाणे यंदा शौर्य दिनानिमित्त सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक स्तंभाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. मध्यरात्री बुद्धवंदना सह जयभीम सलामी देण्यात आली होती. जयभीम सलामीची सिंह गर्जना लक्ष केंद्रित करणारी होती. गणवेषधारी समता सैनिक दल आणि बँड पथकातील एक सूत्रात शिस्तबद्ध होती. हजारोच्या संख्येने बाईक रॅली पुणे स्टेशन ते भीमकोरोगाव पर्यंत नेऊन अभिवादन मार्च हे विशेष आकर्षण होते. ऐतिहासिक विजय स्तंभाला आकर्षक फुलांची सजावट केली असून शौर्य दिनानिमित्त जय्यत तयारी करण्यात आली होती. यानिमित्ताने पोलिसांचा देखील तगडा बंदोबस्त पाहायला मिळत होता. भीमाकोरेगाव या ठिकाणी 5 हजार पोलीस सुरक्षिततेसाठी तैननात करण्यात आले होते. भीमाकोरेगाव येथे 208 व्या शौर्यदिनी ऐतिहासिक विजयस्तंभ शौर्यदिन कार्यक्रमानिमित्त प्रशासनाकडून नियोजनाची जय्यत तयारी करण्यात आली होती. यावर्षी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या धर्तीवर ऐतिहासिक विजयस्तंभास फुलांची सजावट करण्यात आली होती. तब्बल वीस गुंठे जागेमध्ये असलेला 75 फुटी ऐतिहासिक विजयीस्तंभ




१ जानेवारी १९२७ - २०२७

यावर्षी कृत्रिम व खऱ्या फुलांनी सजविण्यात आला आहे. या स्तंभावर फुलांनी अशोकचक्र, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आणि संविधानाचे तैलचित्र लक्ष वेधून घेत होते.

यावेळी उपस्थित जनता आपसातील संवाद करतांना म्हणत होती की, ‘भीमा कोरेगावच्या ऐतिहासिक लढा हा केवळ सैनिकी विजय नव्हता, तर जातीप्रथा आणि अन्यायकारक व्यवस्थेविरोधातील संघर्ष होता.’ यावरुन असे लक्षात येते की अजूनही इतिहासाचे पान वाचल्या जाते. आंबेडकरी वाचकांचे गमक म्हणता येईल.




भीमा कोरेगावचा शौर्यदिन हा सामाजिक न्यायाच्या लक्ष्याचे प्रतीक असल्याचे अनेकांच्या संवादातून दिसत होते. बौद्ध अनुयायी, महार रेजिमेंटचे सर्व जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शौर्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली होती. जिल्हा परिषदेकडून एकूण 23आरोग्य केंद्रे उभारण्यात आली असून, 43 रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या. याशिवाय 18 खासगी रुग्णालयांतील 286 खाटा आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या. आरोग्य सेवेसाठी 155 प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले होते. जनतेच्या सोयीसाठी उपहारगृह आणि पाण्याच्या टँकरसाठी 33 तपासणी पथके कार्यरत होत्या. स्वच्छता आणि पाणीपुरवठ्यासाठीही विशेष व्यवस्था करण्यात आली होती. 80 घंटागाड्या, शुद्ध पाण्यासाठी 150 टँकर्स तैननात असून, पाणी भरण्याच्या ठिकाणी 200 कर्मचारी नियुक्त करण्यात आली होती. संपूर्ण परिसरात 2 हजार 800 शौचालयांची उभारणी करण्यात आली असून स्वच्छतेसाठी 265 सफाई कामगार आणि 260 पर्यवेक्षण अधिकारी व कर्मचारी कार्यरत होते. महिला आणि बालकांसाठी 9 हिरकणी कक्ष सुरू करण्यात आले होते. उपस्थितांची गैरसोय होऊ नये याची काळजी घेतली जात होती.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पुणे शहर पोलिस आयुक्तालयाकडून कडक बंदोबस्त होता. या बंदोबस्तात 1 महानिरीक्षक, 3 पोलिस उपमहानिरीक्षक, 20 पोलिस उपायुक्त दर्जाचे अधिकारी, 8 राज्य राखीव पोलिस दलाच्या तुकड्या, 3 शीघ्र प्रतिसाद दल, 14 घातपातविरोधी पथके आणि 18 बीडीडीएस पथके तैननात करण्यात आले होते. याशिवाय 650 होमगार्ड आणि सुमारे 4 हजार 700 पेलिस अधिकारी व कर्मचारी या सोहळ्याच्या सुरक्षेसाठी कार्यरत होते. संपूर्ण कार्यक्रमावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात आला होता. फेस रिकग्नायझेशनसाठी 251 विकाणी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. वाहन व्यवस्थेसाठी 12 ठिकाणी वाहनतळांची उभारणी करून 20 हजार चारचाकी वाहनांच्या पार्किंगची सोय होती. पेशवाई सोबत झालेल्या युद्धाला 200 वर्ष पूर्ण झाले होते तेंव्हा विविध राज्यांतील लाखो लोक विजयस्तंभाकडे जात असताना पूर्व नियोजित दंगल झाली होती. आलेल्या लोकांवर तुफान दगडफेक आणि अनेक गाड्यांची तोडफोड झाली होती. छोटे मोठे हॉटेल बंद होते. सारी नाकेबंदी करून तेथील लोकांनी आलेल्या लोकांना सहकार्य केले नाही. नगर, पुणे जिल्ह्यातील लोकांनी हे नाकेबंदी तोडून आलेल्या समाजबांधवांना पूर्ण सहकार्य केले होते. या प्रसंगाचे आम्ही साक्षीदार आहोत. देशभरातून आलेली जनता तेथील दंगल आणि दहशत बघून आजही पेशवाईचे वंशज जिवंत आहेत असे म्हणत होती. आम्ही हा प्रसंग अनुभवला आहे. 1 जानेवारी 2026 ला भीमा कोरेगावला भेट दिली असता आलेल्या लोकांना सहकार्य करण्याचे धाडसी काम स्थानिक लोकांनी केले आहे. याबद्दल त्यांचे कौतुक करणे ही आपली नैतिक जबाबदारीच आहे. किंबहुना आम्ही आमच्या बळावर आम्ही उभे होऊ शकतो. असे दाखवून दिले आहे. कुणी फेसबुक फ्रेंड, व्हाट्सअप ग्रूप फ्रेंड होते हे सारे लोक एक दुसऱ्यांना सांगायचे, आहो मी आणि तुम्ही फेसबुकला मित्र आहोत. हे जेव्हा बोलल्या जात होते. सोशल नेटवर्किंग किती महत्वाचे हा पण अनुभव आला होता. येथे येणारे लोक उत्सव, जत्रा म्हणून सहभागी झाले नाही तर आपल्या शूरवीर पराक्रमी पूर्वजांना अभिवादन करण्यासाठी आले होते. एक दुसऱ्याला निरोप देत स्फूर्तीदायक शौर्यभूमिची प्रेरणा घेऊन आपल्या गावाकडे निघाले होते. ■ ■



विलास गजभिये
मो. 9421588901




# आयुष्य : एक युद्ध

## सूर्यात राजमुद्रा कोरणारी कविता

कवी संजय गोडघाटे हे मराठी कवितेतील सन्मान्य नाव. शौर्य दिनी त्यांची भेट झाली. ‘आयुष्य -एक युद्ध’ हे त्यांचे पाचवे अपत्य त्यांनी माझ्या हाती दिले. भुकेशी घनघोर युद्ध लढणारे संजय रक्ताळलेल्या हातांना टाका मारण्यापूर्वी ॲनेस्थेशिया म्हणून दुःखाने गदगदलेली कविता मागतात तेव्हा माझे मन सुन्न होते. जळते निवे गडव्यात भरून इस्त्री करणारा कवी शेवटच्या माणसाच्या फाटक्या जिंदगीचे वास्तव सहजतेने उलगडतो तेव्हा मला माझेच आयुष्य आणि त्यातील एक-एक स्फोटक युद्ध आठवते. बाहेर कोसळणारा पाऊस आताही नकळत त्याच्या डोळ्यातून वाहू लागतो. एकेकाळी भाकरी वाटून खाणारे मित्र काळाच्या ओघात हरवल्याची खंत कवीला आहे. मुळात माणसाला माणूसच समजले जात नसल्याची वेदना कवीने या कवितासंग्रहात मांडली आहे. पाठीवर सिलेंडरचे ओझे घेऊन तिसऱ्या-चौथ्या मजल्यावर पोहोचविण्याचे काम करणाऱ्या मजुराला स्तरीकरणातील वरच्या मजल्यावरील लोकांच्या पदोन्नती किंवा वेतन आयोगाचा अजिबात त्रास नाही. मात्र त्यांच्या बेगडी वागण्याचा होणारा त्रास मांडताना कवी म्हणतो,

आम्हाला या गोष्टीची खंत आहे
तुम्ही आम्हाला माणूस समजत नाही !

युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चेहरा नसलेल्या समाजाला नवजन्म देऊन नवी ओळख दिली. या क्रांतीसुर्याने दिलेल्या संविधानिक बळामुळे कवी सुंदर जगाची स्वप्न पाहतो आणि दुःख, दास्य मुक्तीचे गीत गात माणसावर भरभरून प्रेम करतो.

तो चळवळ जगतो आणि
विझलेल्या क्रांतीला ज्वालांची दीक्षा देतो ।

कवीच्या एका डोळ्यात प्रेम, करुणा, बंधुत्व आहे तर दुसऱ्या डोळ्यात विद्रोहाची फुले आहेत. तो शांत आहे, संयमी आहे आणि सहनशील सुद्धा. पण त्याच्या मुलभूत हक्काचा गळा दाबणे त्याला सहन होत नाही. असा प्रयत्न करणाऱ्यांना तो इशारा देतो,

पण तुम्ही दाबला गळा
माझ्या मूलभूत हक्कांचा तर
‘पाणातिपाता वेरमणी’
या वचनाचा
मला विसर पडू शकतो !

माणुसकीची दीक्षा म्हणजे माणसाच्या जगण्यातला आणि वागण्यातला चांगुलपणा. चांगुलपणा करुणेचे चांदणे वाटते. चांगुलपणा विष पेरत नाही. अंधारावर मात करण्याचे बळ देते. आयुष्याचा दीपोत्सव करणारा चांगुलपणा म्हणजे बंधुत्वाची पेरणी करत सन्मार्गाचे पथिक होत माणसे जोडण्याचा महाप्रकल्प आहे. सर्व भिंती नेस्तनाबूत करुन विश्वाला एकसूत्र आणि एकजीव करण्याचे सामर्थ्य असणारी मानवतेची सर्वोत्कृष्ट परियोजना म्हणजेच चांगुलपणा. हा चांगुलपणा आपल्या आयुष्यात प्रत्यक्ष जगणारे कवी संजय यांचे मन मानवतेने ओतप्रोत भरलेले आहे. माणूस निसर्गाची अनुपम कलाकृती आहे हे सांगताना त्याला डीस्पोजल समजून युज अंड थ्रो करू नका असे आवाहनही कवी संजय गोडघाटे येथे करतात. काळ सोकत चालला आहे. माणूसही सोकत चालला आहे. पण, माणसाचे असे सोकत जाणे हे काळामुळे नव्हे. तो सोकत चालला आहे, ते त्याच्या पराकोटीच्या स्वार्थामुळे. माणसाच्या भावना चेतवणे, पेटवणे व त्यातून त्यास विक्रयमूल्यांच्या फेऱ्यात अडकवणे असा हा चक्रव्यूह आहे. भावनांना हळूवार साद घालणे आणि त्यास नात्याचे आवरण घालून खरेदी विक्रीचा व्यवहार घालणे, ही या चक्रव्यूहातील अत्यंत घातकी संरचना आहे. म्हणूनच आयुष्यात अनेक पातळ्यांवर समर्थपणे लढणारा हा कवी सावलीला सुद्धा भिताना दिसतो.

आणि -

**आता जेव्हा तू म्हणतेस**
**‘मी तुझी सावली आहे!’**
**तेव्हा मला खूप भीती वाटते...**

फितुरी, दगाफटका, धोका, बेईमानी आणि विश्वासघात पदोपदी अनुभवताना कवीला तथागत बुद्धाची खूप आठवण येते. कवी दुःखाना आयुष्यभर कवटाळत नाही. त्यांचा भांडवली वापर करीत नाही. वेदनांची फुले करुन वाटणारा हा कवी वाट्याला आलेल्या प्रयोगाच्या वेदनांकित भाषेला आनंदाचा साज चढवतो.

**तुला भीती कुणाची नाही**
**तू कच्ची माती नाही**
**तू तप्त लाव्हारस आहे**
**तुला कुणीच अडवीत नाही**
**चल ये ! राजमुद्रा कोरु सूर्यात...**

‘माणूसकी’ नाकारणाऱ्या भिंतींना जमीनदोस्त करण्यासाठी व संविधानाला अभिप्रेत राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्यासाठीची निष्ठा आणि बांधिलकी कवितासंग्रहाच्या पानापानातून व्यक्त होते. सभोवतालचे चित्र विदारक आहे. माणूस केंद्रबिंदू असलेल्या व्यवस्थेतील सत्ताधाऱ्यांनी माणुसकीच नाकारल्याचे वास्तव चित्र आहे. संविधानाची शपथ घेऊन सत्तेच्या पदावर आलेली ही माणसे शोषित, वंचित, मागास, उपेक्षित वर्गाशी संविधानिक वर्तन करताना दिसत नाही. भ्रष्टाचार हा त्यांच्या जीवनशैलीचा भाग झाला आहे. सर्वसामान्यांशी चांगले वागत नाही. कामासाठी आलेल्यांशी तुसडेपणाने वागतात. सामान्य माणसांना त्रास व अवहेलना सहन करावी लागते. शेतकरी आत्महत्या करतात. शेतमजूर हवालदिल झाला आहे. रोजगार उपलब्ध नाही. दारिद्र्य आणि बेकारीत प्रचंड वाढ आहे. महिला व बालकांवरील अत्याचार वाढताहेत. श्रीमंत अजून श्रीमंत आणि गरीब अजून गरीब होत आहेत. हे अस्वस्थ वर्तमान आपल्या कवितेतून शब्दबद्ध करणारे कवी संजय हार मानत नाही. अंधाराच्या प्रदेशात राहणाऱ्या आपल्या भावंडाना उजेडवाटा दाखविणारा हा कवी म्हणतो,

**तुझी हिंमत तुझी ढाल,**
**‘क्रांतिगीत’ तुझे बोल**
**तूच मोती, तूच पारस**
**तुझी किंमत रे अनमोल**
**चल ये ! पेरू माणूस समाजात...**

माणसाच्या जगण्याचे वास्तव खरेपणाने मांडत त्याच्या आयुष्याला अर्थ प्राप्त करुन देण्यासाठी धडपडणारा हा कवी भाकरीच्या चतकोरासाठी आवडीची पुस्तकेही विकतो तेव्हा मला आजीच्या प्रेतावरील पैसे उचलणारे माझे गरिबीत करपणारे बालपणही या निमित्ताने आठवते. पाऊस ही या कवितासंग्रहातील पहिलीच कविता वाचून मन गहिवरून येते. बालपण, मालक, अदिन्नादाना, शीर्षक नसलेले आयुष्य, विजू मिस्त्री, पतंग, मागे वळून पाहताना या कवितांमधून कवीच्या वाट्याला आलले दुःख व वेदना चित्रित होते. मजुराच्या कविता, माझी माणसं, कायदा सुव्यवस्था, खेळणीवाला, मशीन, लॉकडॉऊन, आंधळ्याचे सोंग, हातठेला, जिंदगी या कवितांमधून कष्टकरी माणसाचे भणंग आयुष्य मांडत ‘तू काय चीज आहेस जिंदगी’ असा प्रश्न करतात, तेव्हा कविमित्र म्हणून त्यांचा अभिमान वाटतो. डॉ. मिलिंद बागुल यांची आशयगर्भ प्रस्तावना लाभलेल्या या कविता संग्रहाला ज्येष्ठ कवी अर्जुन डांगळे यांचे ब्लर्ब आहे. कवी संजय गोडघाटे यांनी साध्या-सोप्या शब्दात आयुष्याचे अर्थपूर्ण युद्ध मांडले आहे. ठसा प्रकाशन गृह नाशिक यांनी प्रकाशित केलेला हा कवितासंग्रह सूर्यात राजमुद्रा कोरत कोरत मराठी कवितेच्या क्षेत्राला नवीन आयुधे देईल, असा मला विश्वास आहे. ■ ■



प्रा. डॉ. महेंद्रकुमार मेश्राम
मो.9975665862

## मुलींनो सावित्रीची सावित्रीबाई होता आली पाहिजे!

पितृ व्यवस्थेला लाथ मारता आली पाहिजे
गुलामी विरुद्ध बंडखोरी करता आली पाहिजे
असामानते विरुध्द आवाज उठवला पाहिजे
स्वत:चे स्वतंत्र निर्णय घेता आले पाहिजे
मुलींनो सावित्रीची सावित्रीबाई होता आली पाहिजे!
जोडीदाराला ज्योतीबा सांगता आले पाहिजे
पितृसत्तेचे सगड अधिकार ज्योतीबा ने कसे
झिडकारले हे दाखवता आले पाहिजे
अन्याया विरुद्ध धाडस करता आले पाहिजे
सहजीवनाचा टिपिकल अर्थ बदलत
समतेची वाट उभी करता आली पाहिजे
मुलींनो सावित्री ची सावित्रीबाई
होता आली पाहिजे !
पोटच्या बाळ नसलेल्या लेकरांची माई
होता आली पाहिजे
स्त्री मुक्तिची वाट पुढे नेता आली पाहिजे
प्रत्येक बाजूने स्वत: सोबत खंबीर राहता
आले पाहिजे !
हा लढा मनुष्यातल पशुत्व संपवण्यासाठी
निरंतर ठेवता आले पाहिजे !
मुलींनो सावित्री ची सावित्रीबाई होता आली
पाहिजे!

**मिनल मनोहर शेंडे**





## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

### नववर्ष 2026

जग करतो जल्लोष
येता हेच नववर्ष
ऐकायला येते कोणा
स्त्रीच्या किंचाळ्या संघर्ष
पहलगामची हत्या
यज्ञा बालिका लढली
नजरेनी छळे नर
वर सावित्री रडली
रस्ते खड्ड्यात दिसती
यादी नियमांची किती
अपघात कधी होई
असे पांथस्थास भिती
सोनं वाढते रोजच
गरीबांचा प्रश्न लग्न
अतिवृष्टी नेता पिक
शिक्षणाचे स्वप्न भग्न
असो भगवा धनुष्य
पंजा घड्याळ कमळ
सारे राजकीय खेळ
सामान्यांच्या माथी गळ
नेते बदलती पक्ष
निवडणूकांचे सत्र
मागे मत हात जोडे
कार्यकर्त्या नसे छत्र
दोन हजार सव्वीस
तुझ्या मनी काय सांग
काही नविन दाखव
नको जिथे तिथे रांग
एक दिवस साजरा
नको नविन वर्षाचा
वाढो देश विश्व मानो
दिन सोनेरी हर्षाचा...

**डॉ. शील बागडे**

### क्रांतीज्योती सावित्रीबाईचे कार्य

ज्ञान काय आम्हां न ठावे.. शिक्षित करण्या आम्हा सावित्रीबाई धावे.. मनुवाद्याला देऊन ठोसा दगड माती झेलून घाव, महिलांना शिक्षित करावे... 1..

रुढीवादी अंधश्रद्धेची तोडून बेडी सतीच्या चितेची आग विझवली, भृण हत्या बालहत्या केशवनपण थांबविली साऱ्या पीडित महिलांची आई झाली... 2..

शिकून मुली महिला प्रगती झाली कुणी राष्ट्रपती वैमानिक चंद्रावर गेली या युगाची नवी पहाट महिला स्वाभिमानी शास्त्रज्ञ ही झाली... 4..

ज्योतिबाच्या कार्यास पुढे नेले सावित्रीबाईंनी साऱ्या समाजास शिक्षित केले समाजात अस्मिता जागवून महिला पुरुषांसाठी समतेचे कार्य केले... 4...

**इंजि. शुध्दोधन बडवणे**

### बिबट्या आला शहरामंदी

बिबट्या म्हणे आता झालो,
लई बोअर जंगलात राहून
मारून शहरामंदी चक्कर आता,
येतो म्या चांगला फ्रेश होऊन
बिबट्या आला शहरामंदी,
घर माह्य धुंडत फिरत
म्हणे करीन मुक्काम मी,
चंदूच्या घरी हात-पाय पसरत
पाहून पिवळ्या बिबट्याले,
झाली लोकायची लई आसट,
लोके लपे घरामंदी,
बिबट्या फिरे मले धुंडत
कसा-बसा बिबट्या थो,
पोचला घरी माह्या उड्या मारत
म्या नोते घरी तवा त्याची,
झाली भेट माह्या बायको सोबत
बायको माही लई हुशार,
दिला मंतर बिबट्याले हासत
एवढा हुशार बिबट्या थो,
गेल्या तिच्या चाटीत फसत
चाल दावते मी चंदू तुले,
घिऊन मोबाईल हाय खोलीत बसला
बिबट्याले दिला सोडून तिने खोलीत,
दरवाजा बाहेरून लावून घेतला
बिचारा बिबट्या बसून कोपऱ्यात,
होता विचार करत बसला
दया येते थ्या चंदूची मले,
माह्यासारखा असन थो बी फसला

**चंद्रकांत सावळकर**

### सावित्री सावित्री

सावित्री सावित्री
करू जयघोष
कीर्तिचा कळस
उंचावया...!
उजळूनी काया
झाली ज्ञानज्योत
उजेडाची बात
करावया...!
ज्योतिसवे केले
जन सेवा व्रत
बहुजना हित
जोपासया...!
विचार विवेकी
झाला सत्यशोध
तोचि केला बोध
समस्ताया..!
नभी झेप घेतो
तुझ्यामुळे आज
अस्तित्वाचा साज
तुच माई...!

**माधुरी वसंतशोभा**

### तीनध्वज

उंच आकाशात
तीन ध्वज होते
उभे,
मनात त्यांच्या चालु होते
काही मनसुबे,
एकाने विचारले तुझा रंग
कोणता ?
त्याने उत्तर दिले निळा,
दुसरा म्हणाला भगवा,
तिसरा उत्तरला हिरवा.
तिन्ही ध्वज अभिमानाने होते
डौलत,
हवेबरोबर आपल्याच नादात
होते फडकत,
निळा म्हणाला मी आहे
प्रतीक शांततेचे,
भगवा म्हणाला मी आहे
त्यागाचे,
तर हिरवा म्हणाला मी आहे
प्रगतीचे,
किती सुंदर रंग आहेत
आपले,
तिन्ही ध्वज एकसुरात
उद्‌गारले,
अरे, तिकडे
काय झाले,
एक ध्वज
ओरडला लोकांच्या
हातातआहेत तलवार, काठी
अन् भाले.
दुसरा बोलला कोणीतरी
काहीतरी खाल्ले,
तिसरा म्हणाला नाही
कोणीतरी काहीतरी
शिजवले, अरे, ते पहा
आपल्याचखाली निघत आहे
धूर, कोणालातरी म्हणे
जाळले,
रस्त्यावर पहा कसे रक्त
सांडले.
एवढ्यात जोराचे वादळ सुटले,
तिन्ही ध्वज जमिनीवर पडले,
निळा विचारतो भगव्याला
तुझा रंग कोणता ?
भगवा म्हणतो लाल,
हिरवा म्हणतो लाल
निळाही म्हणतो लाल.

**शैलेन्द्र तायडे**

# विद्यार्थीप्रिय शिक्षिका नेनेमॅडम

**मंगळवार दि. 23 डिसेंबर 2025 रोजी दुपारी लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय कार्याध्यक्ष साहित्यिक अरुण इंगवले दादांनी पाठविलेला मेसेज वाचला. ‘नेने मॅडम आज दुपारी गेल्या. पाच वाजता अंत्यसंस्कार आहे.’ मेसेज वाचून डोळ्यातून अश्रू आले. जातधर्मापलीकडे गेली तीस वर्षे ऋणानुबंध असणाऱ्या नेने मॅडम यांचे निधन, चिपळूण मधील दोन्हीही वाचनालय परिवारसह शिक्षण, साहित्य, कला क्षेत्रातील आम्हा सर्वांसाठी कुणीतरी आपल्याजवळची, मायेची व्यक्ती गेल्याची मनात समान भावना निर्माण झाली आणि हे वास्तव कुणीच नाकारू शकत नाही. कारण नेने मॅडम या सर्वांसाठी शिक्षिका, आदर्श मार्गदर्शक होत्या. वयाच्या 83 वर्षी त्यांचे जाण हे तसे अकल्पित होते.**

आपल्या नियोजनबद्ध दिनक्रमानुसार त्या जगल्या आणि वागल्या. नीटनेटके रहाणीमान, मितभाषी, स्मित हास्य, हळूच एखाद्याची फिरली घेणार, त्यांच्या चांगल्याच कौतुक करणार, काही उणिव भासली तर मार्गदर्शन करणार, एखाद्या साहित्य विषयावर चर्चा करणे, ही गुणग्राहकता त्यांच्याकडे होती. घरी गेल्यावर तेवढ्याच आपुलकीने यथायोग्य स्वागत करणार, प्रेमळ स्वभाव असणाऱ्या नेने मॅडम यांची माझी पहिली भेट लोकमान्य टिळक स्मारक वाचनालयात झाली. कोकण मराठी साहित्य परिषद चिपळूणच्या एका ‘काव्य संध्या’ कार्यक्रमात झाली. त्यांनी माझी कविता ऐकून, सुंदर सादरीकरण आणि आवाज अशी दाद दिली. तिथपासून त्या मला कविराज कधी शाहीर म्हणत. आठ दिवसांपूर्वी मॅडम जास्त आजारी झाल्यावर अरुण दादांनी फोन मेसेज केला. नेने मॅडमना बघून या. मी चिपळूण मध्येच होतो. दहा मिनिटात त्यांच्या घरी गेलो. बहिणींने दार उघडताच मला पाहून हे राष्ट्रपाल सावंत कवी, शाहीर, लेखक आहेत, ओळखते का? असे बहिणीला विचारले. ताईने हो म्हणल्यावर मला विचारले, तुमच्या पुस्तकावर लिहिलेला अभिप्राय अरुणदादाकडून तुम्हाला पाठवला होता. मी हो म्हणालो. छान लिहिला आहे. प्रतिक्रिया दिली होती. मग पुन्हा त्यांनी वाचनालय विषयी माहिती घेतली. चिपळूण मधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय रौप्य महोत्सव वर्ष साजरे करीत आहे. त्या निमित्ताने मार्च 2025 पासून विविध कार्यक्रम नियोजनबद्ध होत आहेत. या महोत्सवाचा शुभारंभ लोकसभेच्या माजी अध्यक्षा चिपळूण तालुक्यातील माहेरवाशीन नेनेमॅडम यांच्या बाल मैत्रीण आदरणीय सुमित्राताई महाजन यांच्या उपस्थितीत पार पडला आणि त्याच संध्याकाळी नेने मॅडम लिखित अरुणजी इंगवले यांनी निवडक कवितांचे संकलन करून प्रकाशित केलेल्या ‘मायबोली’ या काव्यसंग्रहाचे ताईंच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. आपल्या मैत्रिणीच्या उपस्थितीत तिच्या हस्ते प्रकाशन करायचे अशी मॅडमची इच्छा होती. त्यांची ही इच्छा आदरणीय प्रकाशजी देशपांडेसर, धनंजय चितळे, अरुण इंगवले, दोन्ही वाचनालय परिवार सर्वांनी पूर्ण केली. उच्च पदावरील एक मैत्रीण आपल्या बाल मैत्रिणीच्या पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला येऊन त्यांच्या मैत्रीची साक्ष देऊन जाते. हीच खरी नेने मॅडम यांच्या मैत्री जपण्याच्या कार्याची पोहच पावती ठरली. सुमित्राताई महाजनांच्या भाषणाने त्यांच्यासह सर्व भारावले. प्रकाशन सोहोळ्याच्या कार्यक्रमात प्रमुख मान्यवरांच्या संगतीत बसण्याचे भाग्य मला नेने मॅडमच्या काव्यसंग्रह प्रकाशनमुळे मिळाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय स्थापना, त्याची निर्मिती प्रक्रिया यात नेने मॅडम यांचा सहभाग अविस्मरणीय आहे. वाचनालय पत्ता म्हणजे नेने मॅडम यांच निवासी घर. सुरुवातीस त्या कार्यवाह होत्या. वाचनालयाच्या जडण घडणीत त्यांच्या योगदानाबद्दल सविस्तरपणे लेख होईल. आजारी अवस्थेतही वाचनालय रौप्य सांगता समारोप काय नियोजन करण्यात आले आहे. कुणाला बोलावले आहे. चांगला कार्यक्रम करूया म्हणाल्या. मी ही त्यांना तुम्ही जोडीला असल्यावर आम्हाला कमी काय? तुम्ही लवकर बऱ्या व्हा म्हणालो. त्या हसल्या. तुमचे पुस्तक दोन वेळा वाचले, छान लिहिले आहे. नवीन काय लिहिताय विचारे, मी माहिती दिली. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांच्या मनात वाचनालय बाबत आस्था होती. नियमित सर्व पेपर वाचणे, महत्त्वाच्या लेखांना टीक करून त्यांची कात्रण काढणे, विषयानुसार एकीकरण करून कागदावर चिटकवून बाईंडिंग करणे हा त्यांचा गुण मला उपयुक्त ठरला. अनेक कात्रण फायली त्यांनी तयार केल्या. चिपळूण मधील दोन पुरानी वाचनालय मधील अनेक दुर्मिळ एकत्रित कात्रण संग्रह बाद झाले. काही पुन्हा सुकवून संग्रही ठेवले आहेत. नेने मॅडम यांचे दैनिक सागर मधील लेख मी अनेक वर्ष वाचत आलोय. नित्य प्रासंगिक वैचारिक असे त्यांचे लेखन आहे. दैनिक सागर मधील मी लिहिलेले लेख वाचून त्यावर त्या फोन करून अभिप्राय देत. छान लिहिताय. समीक्षा लेखनही करताय, लिहित रहा म्हणत. चिपळूणला वाचनालयात मला प्रेरणा प्रोत्साहन देणारी कौतुक मार्गदर्शन करणारी कौटुंबिक जिव्हाळ्याची माणसे मिळाली त्यातील एक नेने मॅडम आहेत. पंचवीस वर्षापूर्वीच्या आमच्या नवोदितांच्या काव्य मैफलीत मॅडम सहभागी होत. त्यांचा ‘मायबोली’ काव्यसंग्रह निर्मिती प्रक्रियेत अरुण दादांचा सहभाग मोठा आहे. नवनवीन सुचना बद्दल दादांनी न कंटाळता मोठ्या आनंदाने केले. देशपांडे सरांनी प्रस्तावना लिहिली. आधी नेने मॅडम यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन, मग माझ्या पुस्तकाचे प्रकाशन करू असा मी ही निर्णय घेतला. एकमेकांच्या आनंदात आम्ही असे सहभागी झालोय. कवी मित्र अरुण इंगवले, मंदार ओक, मंगेश बापट, कांता कानिटकर, अंजली बर्वे, शशिकांत मोदी, सतीश कदम, डॉ. वि णा कानडे, प्रा. सुहास बारटक्के, साहित्यिक श्रीराम दुर्गे स्मिता देवधर, अप्पा जाधव, भालचंद्र दिवाडकर, दादा फडके, देशपांडे सर अशा ज्येष्ठ मंडळीसह जिल्ह्यातील नवोदित कविसोबत आमच्या काव्य संध्या रंगल्या आहेत.




नेने मॅडम यांच्याबद्दल अनेक आठवणी प्रत्येकाच्या संग्रही आहेत. सर्वांच्या त्या अंतःकरणात आहेत. सर्वजण व्यक्त होतील. मॅडम चिपळूण मध्ये युनायटेड इंग्लिश स्कूल मध्ये इंग्रजी शिकवत. निवृत्तीनंतर त्याच संस्थेच्या कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी कार्यरत राहिल्या. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले. लोकमान्य टिळक स्मारक वाचनालयात संचालक होत्या. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना सोबत अनेक संमेलनात उपक्रमांत, तसेच चतुरंग संस्थेच्या कार्यकर्त्या होत्या. त्यांना गायनाची आवड होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय उभारणीत योगदान देणारे तात्यासाहेब कोवळे, रमेश चिपळूणकर गुरुजी सह अन्य सर्व मंडळी यांची उणिव रौप्य महोत्सव सांगता समारंभात जाणवेल. आम्ही त्यांचे स्मरण ठेवून वाचन, साहित्य, सामाजिक सांस्कृतिक चळवळीतील कार्यरत राहू हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. लहान थोर सर्वांशी आपुलकीने प्रेमाने, नी आदराने बोलणाऱ्या, त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या मातृतुल्य नेने मॅडम यांना भावपूर्ण श्रद्धांजली! ■ ■



राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - ५०

## समतेचे अग्रदूत बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा गुंथारा. जि. भंडारा.




अखिल भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा गुंथारा जि. भंडारा भंडारा जिल्ह्यात प्रत्येक गावात बहुतेक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे आहेत. विविध दिनविशेष कार्यक्रमात लोक एकत्र येतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
मो. 9370773608

# बार्टीच्या 'संविधान' बुक फेअरला अलोट गर्दी!

## बार्टीच्या समन्वयामुळे शौर्य दिनी अनुयायांना दर्जेदार सुविधा उपलब्ध





**भीमा कोरेगाव :** ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिनानिमित्त अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी चांगल्या प्रकारे सोयी - सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर बार्टीमार्फत संविधान बुक फेअरचे आयोजन करण्यात आले होते. या बुक फेरलाही प्रचंड प्रतिसाद मिळाला.

सामाजिक न्याय विभागामार्फत अनुयायांच्या सोयी - सुविधांसाठी जवळपास 15 कोटी रुपयांचा निधी बार्टीच्या माध्यमातून जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, पोलीस विभाग पीएमपीएल, दूरदर्शन, बीएसएनएल अशा विविध प्रशासकीय यंत्रणेला उपलब्ध करून देण्यात आला होता. या वर्षी राज्यातून लाखो भीमसैनिकांनी विजयस्तंभ स्मारकास भेट देऊन मानवंदना दिली.

बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टीचे निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागाचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी प्रशासनातील सर्वच विभागाशी समन्वय साधून अनुयायींना चांगल्या दर्जाच्या सेवा - सुविधा उपलब्ध होण्यासाठी सातत्याने सर्वच विभागाशी समन्वय ठेवला होता. तसेच प्रत्यक्ष सर्व विभागांच्या तयारीचा आढावा सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी घेतला होता. त्यामुळे भीम अनुयायांना चांगल्या सुविधा उपलब्ध झाल्या होत्या. त्यामध्ये शौचालय पिण्याच्या पाण्याची सुविधा, विजय स्तंभाचे सुशोभीकरण, पार्किंगची व्यवस्था, आरोग्य, हिरकणी कक्ष, बुक स्टॉल, बस वाहतूक आदी सुविधांचा समावेश होता.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 300 बुक स्टॉल पुस्तक विक्रेत्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच बार्टी संस्थेच्या माध्यमातून सवलतीच्या दरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथ व इतर महामानवांचे ग्रंथ अनुयायींना उपलब्ध होण्यासाठी तीन शिफ्टमध्ये बुक स्टॉल सुरू करण्यात आला होता. या स्टॉलवर मोठ्या प्रमाणात अनुयायांनी गर्दी केली होती. या बुक स्टॉलचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी डॉ. भारत कदम, अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे यांच्या हस्ते झाले. संविधान जनजागृतीसाठी बार्टीने यंदा शौर्यभूमीत संविधान कट्टा, संविधान सेल्फी पॉईट, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भव्य प्रतिकृती डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान देतानाचा सेल्फी पॉईट, संविधानिक मूल्यांचा प्रचार करणारे होर्डिंग, बॅनर्स, बार्टी संस्थेच्या विविध योजनांची माहिती देणारे फलक लावले होते. बार्टी बुक फेअरला लाखो भीमसैनिकांनी भेट देऊन बार्टीच्या या उपक्रमाचे स्वागत करून अभिनंदन केले.

निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागाचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड, विभाग प्रमुख अनिल कारंडे, रवींद्र कदम, शुभांगी पाटील, लेखाधिकारी नितिन चव्हाण, प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, रामदास लोखंडे यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांनी शौर्य दिन सोहळा यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

**बार्टीच्या सेल्फी पॉईंटचे कौतुक**

यावर्षी बार्टीच्यावतीने अत्यंत सुंदर आणि आकर्षक असे सेल्फी पॉईंट तयार केले होते. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान देताना असा एक सेल्फी पॉईट होता. त्याला दिवसभर फोटो काढण्यासाठी झुंबड उडाली होती. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 15 फुटी पुस्तक वाचतानाचे कट आउट सर्वांचे लक्ष वेधून घेते होते, येथेही अनेकांनी फोटो घेतले. त्याचबरोबर संविधानाच्या मोठ्या प्रतिकृतीचे कटआऊटही सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.



## दिलीपराव वानखेडे यांच्या जयंतीनिमित्य शालेय साहित्याचे वाटप तथा भोजनदान

**नागपूर :** स्मृतीशेष दिलीपराव लक्ष्मणराव वानखेडे मुख्य संग्राहक नागार्जून संग्रहालय पुणे, कामठी नागपूर यांच्या 69 व्या जन्मदिनानिमित्त नागार्जून संग्रालयाचे विश्वस्त हर्षल दिलीपराव वानखेडे व वानखेडे परिवाराच्या वतीने नवयुवक उच्च प्राथमिक शाळा कामठी येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप व भोजनदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष सितारामजी रडके, विशेष अतिथी म्हणून दीक्षाभूमीचे सदस्य भदन्त नागदिपकर महास्थवीर, प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसेवक निरज यादव, नवनिर्वाचित नगरसेविका सनिका खांडेकर, माजी नगरसेवक प्रतिक पडोळे, समाजसेवक गौतम माटे, हर्षल वानखेडे, आरोही कॉन्व्हेंट डिजीटल स्कूलच्या प्राचार्या मयुरी यादव उपस्थित होते. याप्रसंगी नवनिर्वाचित नगरसेवक निरज यादव व नवनिर्वाचित नगरसेविका सानिका खांडेकर यांचा शाळेच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विजय नंदनवार यांनी तर संचालन व आभारप्रदर्शन राजकुमार शेन्डे यांनी केले. यावेळी वानखेडे कुटुंबातील सदस्य आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राखी बागडे, दिक्षा फुले व विभा सोनडवले यांनी प्रयत्न केले.

## महत्वाचे

### बीआरएसपी द्वारा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



**नागपूर :** बहुजन शैक्षणिक चळवळीच्या प्रणेत्या आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बी आर एस पी च्या त्रिशरण चौक येथील प्रदेश कार्यालयात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रमेश पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी रमेश पाटील यांनी समायोजित विचार व्यक्त केले. कार्यक्रमात एस. टी. पाझारे, दिलीप पाझारे, संतोष ठवरे, चंद्रभान मेश्राम, प्रवीण खापर्डे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

### पौष पौर्णिमेनिमित्त आज धम्मदेसना व धातु दर्शन

**नागपूर :** द बुद्धिस्ट गोल्डन इरा वूमेन्स फाउंडेशन व भिक्षु संघ यांच्या वतीने भारतीय संविधान हीरक महोत्सव निमित्त जनजागृती संविधान की एक लघु नाटिकेचा प्रस्तुतीकरण. भीमा कोरेगाव शौर्य वीरांना मानवंदना, सावित्रीबाई फुले जयंती सोहळा.

कार्यक्रमाचा आकर्षण म्हणजे भिक्षू संघाच्या नेतृत्वामध्ये धम्मदेशना व धातु दर्शन. दि. 4 जानेवारी 2020 डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्वेंशनल सेंटर कामठी रोड नागपूर येथे आयोजित केला आहे. जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन सुनंदा कोचे यांनी केले आहे.

### फुले दांपत्यांना भारतरत्न देण्यात यावे : संविधान परिवाराची मागणी



**नागपूर :** संविधान परिवाराच्यावतीने गेल्या वीस वर्षापासून सरकार दरबारी फुले दांपत्यांना भारतरत्न देण्यात यावे अशी मागणी केली आहे. संविधान परिवाराच्या वतीने देशातील पहिल्या शिक्षिका आधुनिक भारताच्या संस्कृतीची मूर्तमेढ रोवणाऱ्या स्त्रियांना स्वाभिमानाचे व सामर्थ्याचे व तिच्या अस्तित्वाची जाणीव करून देणाऱ्या माई सावित्रीबाई फुले यांच्या195 व्या जयंतीनिमित्त फुले मार्केट येथील सावित्रीबाई फुले महात्मा फुले यांच्या पुतळ्याला हा अर्पण करून घोषणा देण्यात आल्या. फुले दांपत्यांना भारतरत्न देण्यात यावे. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी राष्ट्रीय संयुक्त मोर्चाचे संयोजक गोपाल ऋषीकर भारती तसेच डॉ. ईश्वरदान आशिया, डॉ. जिमोंकर, डॉ. वर्षा चौरे, प्रा. रमेश पिसे इत्यादींनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर व जीवनावर प्रकाश टाकला. संविधान परिवाराचे मुख्य संयोजक प्रा. राहुल मून यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी संविधान परिवाराचे मार्गदर्शक कामगार नेते चंद्रहास सुटे, सुरेश तामगाडगे, प्रशांत ढाकणे, कॉ. राजेंद्र साठे, प्रमोद मून, मीरा मदनकर, प्रा. चंद्रकांत डुमरे, श्रीरंग मदनकर, जितेंद्र जिभे, राजेश पाटील, प्रदीप नारायणे, राजू चव्हाण इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. संविधान परिवाराचे मुख्य संयोजक यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. तसेच सुरेश तामगडगे यांनी आभार व्यक्त केले.

## 'महिला सक्षमीकरणाच्या आद्यप्रवर्तक मातोश्री अहिल्याई' या पुस्तकाचे आज प्रकाशन




**नागपूर :** नागपूरचे सुप्रसिद्ध होळकरशाहीच्या इतिहासाचे अभ्यासक व साहित्यिक होमेश भुजाडे द्वारा लिखित 'महिला सक्षमीकरणाच्या आद्यप्रवर्तक मातोश्री अहिल्याई' या पुस्तकाचे प्रकाशन दि. 4 जानेवारी 2026 रोज रविवारला दुपारी 12 वाजता खंडोबा वाघोबा देवस्थान सभागृह वणी, जि. यवतमाळ येथे होत आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पांडुरंग पडिले (अध्यक्ष खंडोबा वाघोबा देवस्थान चॅरिटेबल ट्रस्ट वणी), प्रमुख मार्गदर्शक होमेश भुजाडे (सुप्रसिद्ध साहित्यिक तथा होळकरशाहीच्या इतिहासाचे अभ्यासक) हे राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून श्रीकांत चामाटे, सुनील पोराटे, अशोक सुर, देविदास बोबडे हे राहणार आहेत. प्रस्तुत पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन खंडोबा-वाघोबा देवस्थान चॅरिटेबल ट्रस्ट वणी, महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच वणी, महाराजा यशवंतराव होळकर सार्वजनिक वाचनालय वणी, धनगर समाज अधिकारी/कर्मचारी संघटना वणी, राजमाता अहिल्यामाई होळकर महिला मंच वणी यांनी केलेले असून पुस्तक प्रकाशन सोहळ्या बरोबरच वणी, मारेगाव आणि झरी जामणी तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी, विविध कर्मचारी - अधिकारी, कला, संगीत, क्रीडा क्षेत्रातील नामवंत मंडळी, सेवानिवृत्त जेष्ठ नागरिक यांचाही सत्कार सोहळा व प्रबोधन मेळावा देखील आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन आयोजन समितीतील रघुनाथराव कांडरकर, विलास शेरकी, किर्तनकार व प्रबोधनकार चीडे यांनी केलेले आहे.

## गांधीजींच्या समोरच महिलांनी व्यसनाला बदडले



संवादमित्र गौरव आळणे

**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व नशाबंदी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने चला व्यसनाला बदनाम करूया या उपक्रमामध्ये महिलांनी सहभाग नोंदवून महात्मा गांधीजींच्या पुतळ्याला साक्षी ठेवून दारूच्या व्यसनाच्या प्रतीकात्मक बाटलीला चपलांनी बदडून काढले. 2026 मध्ये मी व्यसनमुक्त राहीन या नशाबंदी मंडळच्या संकल्पाला उपस्थित नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. एकीकडे चंगळवादी, भोगवादी संस्कृती वाढत असताना नागपूरकरांचा या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद महाराष्ट्राला नशामुक्तीकडे नेण्याचे पाऊल आहे असे मंडळच्या वतीने जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी सांगितले. यावेळी कोराडी शाखा अध्यक्ष ताराचंद पखीडे यांनी व्यसनमुक्तीचा संकल्प दिला. गीत व घोषणांनी परिसर दुमदुमला होता यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य उपाध्यक्ष संजय शेंडे, जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग, व्यसन प्रबोधन विभाग कार्यवाह अशोक पाटील, सांस्कृतिक कार्यवाह मालती वराडे, रुचिका मेश्राम, संध्या अलोने उपस्थित होते. यावेळी संघटनेमध्ये कार्य करण्यास उत्सुक असणाऱ्या तरुणांना 8600145219, 7370138078 वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले.

## बौद्ध धम्मात पौष पौर्णिमेचे महत्व : भगवान कांबळे



**नागपूर :** 14 ऑक्टोबर 1956 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला बौद्ध धम्म दिला. त्यामुळे आम्ही बौद्ध झालो. त्यातून पौर्णिमेचे महत्व समजले आहे. आम्ही प्रत्येक पौर्णिमा साजरी केली पाहिजे. असे धम्मप्रचार सेवक भगवान कांबळे यांनी आपल्या व्याख्यात सांगितले. जयभीम प्रेरणा स्मारक समिती चंद्रमणी नगर नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले, त्रिशरण पंचशील बुद्ध, धम्म आणि संघ वंदना झाल्यानंतर धम्म गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. द्वितीय व्याख्यानमालेचे पुष्प बौद्धाचार्य भगवान कांबळे गुंफले होते. अध्यक्षतेखाली एन. आर. गायकवाड होते. राजगृह नगरीचे महाराजे बिंबीसार हे कपिल वस्तूचे महाराज राजा शुद्धोदनाचे मित्र होते, त्यांनी सिद्धार्थ गौतमाला अर्धे, राज्य देऊ केले, आणि राजपुत्राने राज्य करावे, असा आग्रह केला. परंतु राजपुत्र सिद्धार्थ गौतमाने त्यांचा आग्रह आदर पुर्वक नाकारला, तेव्हा त्यांनी वचन घेतले की, सिद्धार्थाला सम्यक संबोधी प्राप्त झाल्यावर त्यांची नव्या मार्गाचा उपदेश करावा, त्यानुसार याच जानेवारी महिन्यात पौष पौर्णिमेच्या दिवशी राजा बिंबीसाराची धम्मदीक्षा राजगृहात संपन्न झाली, पौष पौर्णिमेचे महत्व यावर भगवान कांबळे यांनी भाष्य केले, या प्रसंगी भगवान कांबळे यांचा जाहीर सत्कार एन. आर. गायकवाड यांनी केला. संचालन आभार कमलेश यादव तर पुष्पा उके, नम्रता पात्रे, सुशिला बागडे, अरुणा गणवीर, निर्मला पात्रे, बंटी उके, बाबी उके, सीमा गायकवाड, कुमार चव्हाण, रेखा रावळे, सुशील गायकवाड, संजय पात्रे, नरेश चव्हाण, आशिष गायकवाड, धनराज चव्हाण, रितिक बोरकर यांनी सहकार्य केले.

## मूल्यसंगर साहित्य विचार मंचचे थाटात उद्घाटन




संवादमित्र प्रकाश बावनगडे

**नागपूर :** मूल्यसंगर साहित्य विचार मंच, नागपूर द्वारा नटराज सभागृह, हिंदी मोर भवन, झांसी राणी चौक सिताबर्डी, नागपूर या ठीकाणी गुरुवार दि. 1 जानेवारी 2026 ला दुपारी दोन वाजता संस्थेच्या बॅनर चे उद्घाटन, प्रा. जावेद पाशा कुरेशी यांचा सपत्नीक सत्कार तसेच भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त कविसंमेलन घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इ. मो. नारनवरे ज्येष्ठ कवी, गझलकार, गीतकार प्रमुख अतिथी सुदर्शन पनतोडे सेवानिवृत्त अपर महानिदेशक व जगदीश राऊत अध्यक्ष मूल्यसंगर साहित्य विचार मंच, नागपूर हे होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला पाहुण्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मूल्यसंगर साहित्य विचार मंच, नागपूरच्या बॅनरचे इ. मो. नारनवरे यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. तसेच पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. संजय गोडघाटे यांनी भारतीय संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. माणिकराव खोब्रागडे यांनी प्रास्ताविक वाचन केले. सन्मानपत्राचे वाचन जगदीश राऊत यांनी केले. त्यानंतर प्रा. जावेद पाशा कुरेशी यांचा शॉल, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना प्रा. जावेद पाशा म्हणाले, सध्या माझे चाळीस पुस्तके प्रकाशित आहेत. माझे हे व्यापक कार्य बघून सुनिल देशमुख फाउंडेशन चा 2025 या वर्षीचा 'सामाजिक कर्यकर्ता 'संघर्ष' हा पुरस्कार जाहिर झाला. त्यानिमित्त मूल्यसंगर साहित्य विचार मंच, नागपूरने माझा सत्कार केला याचा मला अत्यानंद होत आहे. मी या संस्थेचा आभारी आहे. मुख्य अतिथी सुदर्शन पनतोडे म्हणाले, मतभेद असावेत, पण मनभेद असू नयेत. नागरिकांनी अशा चांगले कार्य करणाऱ्या संस्थांना आर्थीक मदत करायला पाहिजे. कविसंमेलनाच्या सुरवातीला प्रा. डॉ. मनोहर नाईक यांनी 'मी सत्य सांगण्यासाठी, सत्तेशी घेतले वैर..' या ओळीनीशी कविसंमेलनात उर्जा निर्माण केली. त्यानंतर प्रा. डॉ. महेंद्रकुमार मेश्राम, डॉ. भोला सरवर, प्रभु राजगडकर, माधुरी वसंतशोभा, नागेश वाहुरवाघ, प्रा. हृदय चक्रधर, प्रसेनजीत गायकवाड, खेमराज भोयर, भीमराव गणविर, चित्तरंजन चौरे, हेमलता मिश्र मानवी, प्रा. संदीप गायकवाड, दिपक पंचभाई, जमील अंसारी, सुभाष मानवटकर, ज्योत्स्ना बनसोड, लिलाधर गायकवाड, हरिदास बेलेकर, मनोहर गजभिये, एस. आर. शेंडे, प्रकाश दुलेवाले, सुमित राठोड, मीरा मदनकर इ.कवींनी आपल्या दमदार रचना सादर केल्या. इ. मो. नारनवरे यांनी सर्व कवींचे स्वागत करुन अध्यक्षिय मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राचे संचालन कवी संजय गोडघाटे व कविसंमेलनाचे संचालन कवी रंगराज गोस्वामी यांनी केले. आभार प्रकाश बावनगडे यांनी मानले.

## नवोदितांना प्रोत्साहन देणारे पहिले आदिवासी साहित्य संमेलन




**गडचिरोली :** 45-99अनेक संस्थेचे दररोज कुठे ना कुठे साहित्य संमेलन, कविसंमेलन होत असतात आणि त्या संमेलनात अनेक कवी, कवयित्री, लेखक, लेखिका आवर्जून सहभागी होत असतात. काहींना संधी मिळत असते तर काहींना डावलले जाते. ही आजची वास्तविकता आहे. कारण प्रत्येकच कवी, कवयित्रींची आर्थिक परिस्थिती एकसारखी नसते. त्यामुळे त्यांना संधी येऊन सुद्धा त्यांचे जाणे होत नाही. असेच एक नुकतेच म्हणजेच 23 आणि 24 तारखेला मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई अनुदानित महात्मा जोतिबा फुले कला महाविद्यालय आष्टी जि. गडचिरोली येथे, पहिले आदिवासी साहित्य संमेलन भरले होते. हा साहित्य संमेलन होणार हे कळताच साहित्य वारीतील वारकऱ्यांना फारच आनंद झाला होता. कारण या पहिले आदिवासी साहित्य संमेलन गडचिरोली सारख्या जिल्ह्यात होणे म्हणजेच सर्वांना आपलेसे वाटत होते. इथे सर्वांना जाण्याची संधी मिळेल हीच एक ओढ लागली होती. योगायोग म्हणावे लागेल या संमेलनाला, संमेलनाध्यक्ष म्हणून लाभलेले राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त जेष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. विनायक तुमराम अभ्यासू व्यक्तिमत्व, म्हणजेच साहित्य वारीतील वारकऱ्यांचे आधारस्तंभ होते. त्यांच्यासोबत कधी भेट होईल हि ओढ अनेकांना होती. उद्घाटक म्हणून लाभलेले या झाडीपट्टीचा अस्सल हिरा पद्मश्री डॉ. परशुराम खुणे जेष्ठ रंगकर्मी, रसिकांच्या मनात जिवंत असलेला कलावंत जणू सर्वांना हवेहवेसे वाटणारे, त्यांच्या प्रत्येक शब्दातून समाजाला नवी दिशा मिळत असते असे आभ्यासक, समीक्षक आणि मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रमोद मुनघाटे, स्वागताध्यक्ष बबलूभैया हकीम सर्वांना सोबतीला घेऊन चालणारे व्यक्तीमत्व, मंचावर नावाजलेले बरेच मान्यवर होते, सोबतच या संमेलनात सहभागी होणारे वक्ते, कार्यकर्ते आणि सहकार्य करणारे महोदय जणू झाडीमायेचे लेकरे होते आणि त्यात एक झाडीमायेचा, सर्वांना एकत्र आणण्यासाठी धडपड करणारा कर्तृत्ववान लेकरू म्हणजेच प्रा. राजकुमार मुसणे होय.

किती स्तुती करावे या संमेलनाची? शब्दच कमी पडतात. दूरदूरचे विविध क्षेत्रात काम करणारे कवी, कवयित्री, वक्ते वेळात जमा झाले, ग्रंथ दिंडीत महापुरुषांच्या वेषभूषा धारण केलेले विद्यार्थी, कलावंत जणू समतेचा, समानतेचा, एकतेचा, बंधू भावाची शिकवण देत होते. संमेलनस्थळाची सजावट सुद्धा अगदी व्यवस्थित होती, दोन दिवस राहाण्याची उत्तम सोय, खाण्यापिण्याची सोय, नास्ता तर उत्तमच होता असे एकही व्यक्ती म्हणाला नाही की, आमची गैरसोय झाली. विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्य, बंगाली नृत्य सादर करून वाहवा मिळवली, बाहेर विविध पुस्तकांचे स्टॉल लागलेले बघून कदाचित निसर्ग सुद्धा गहिवरून गेला असावा.

त्यात बरेच परिसंवाद झाले, त्या परिसंवादात प्रत्येक वक्ते आपल्या अनुभवातून बोलले तेथे उपस्थित असलेल्या विद्यार्थी, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मोलाचे मिळाले. सोबतच एका सत्रात म्हणजेच चर्चा सत्रात मला सुद्धा वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. सोबतच कविसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण मिळाले हि माझ्यासाठी खूप मोठी पावती होती. एवढ्या सत्रातील महत्वाचा सत्र म्हणजेच कविसंमेलन होय. या कविसंमेलनात बरेच कवी, कवयित्री सहभागी झाले होते. त्यात काही नवोदित कवी सुद्धा सहभागी झाले होते. दहाव्या वर्गात शिकणारा मु. गोठणगाव येईल नवोदित कवी हर्षल मेश्राम यांनी म्हटले आहे की, माझ्या जीवनातील हा पहिलाच मंच आहे. या एवढ्या मोठ्या मंचावर मला कविता सादरीकरण करायला मिळाले आणि मला येथूनच खऱ्या अर्थाने प्रोत्साहन मिळाले समोर लिखाण करायला आणि कविता सादरीकरण करायला मला नवी दिशा मिळाली. एकप्रकारची ही माझ्यासाठी खूप मोठी संधी होती. मला मानधन, सन्मानचिन्ह सुद्धा मिळाले. जीवनात पहिल्यांदाच असा मानसन्मान मिळाला आज मी पुन्हा एकदा नव्याने लिखाण करायला तयार आहे. या साहित्य पंढरीत असे कितीतरी नवोदित कवी, कवयित्री आहेत की, त्यांना संधी मिळत नाही. आज या, पहिले आदिवासी साहित्य संमेलनाने अनेक नवोदित कवी, कवयित्रींना मानसन्मान, मानधन, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या संमेलनात सहभागी होणारे सर्वचजण फार आनंदात दिसत होते. जणू त्यांच्यासाठी खूप मोठी संधी होती. या, सर्वांना एकत्रित आणण्यासाठी महात्मा जोतिबा फुले कला महाविद्यालय आष्टी येथील सर्वच कर्मचारी, प्रा. वृंद आणि खास करून प्रा. राजकुमार मुसणे यांनी क्षणभर विश्रांती न घेता या पहिले आदिवासी साहित्य संमेलनाला यशस्वी केले. या झाडीमायेच्या व निसर्गरम्य ठिकाणी झालेले हे पहिले आदिवासी साहित्य संमेलन प्रत्येकांच्या आठवणीत मात्र कायम राहील. अशी व्यवस्था आणि सर्वाप्रती आदर, मानसन्मान सोबतच सर्वांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. असे संमेलन आणि आयोजन असेल तर नक्कीच-नवोदितांना प्रोत्साहन मिळू शकते असे प्रोत्साहन पहिले आदिवासी साहित्य संमेलन कला महाविद्यालय आष्टी यांनी नवोदितांना दिले हे विशेष! त्यामुळे या संमेलनात सहभागी झाले होते, ते सर्वजण आभार व्यक्त करत आहेत.


शील.! शौर्य.!! बलिदान.!!!

## समता सैनिक दल

संस्थापक : महासरसेनापती डॉ. बाबासाहेब आंबेडकर
स्थापना: 19 मार्च 1927 (महाड)
मुख्यालय : पवित्र दीक्षाभूमी, नागपूर



भदन्त नागदिपांकर - मार्गदर्शक
डी.एफ.कोचे - राष्ट्रीय अध्यक्ष
एम.आर.राऊत - राष्ट्रीय महासचिव
प्रदीप एस.डोंगरे - राष्ट्रीय जी.ओ.सी.

### जयभीम प्रवर्तक लोकप्रिय बाबु हरदास एल.एन.स्मृती जनजागृती पंधरवाडा कार्यक्रम : दिनांक 1 जानेवारी ते 16 जानेवारी 2026

| अ.क्र. | तारीख | कार्यक्रम | स्थळ | वेळ | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 1 जानेवारी 2026 | भीमा कोरेगांव महासंग्राम दिवस (शौर्य दिन) | समता भूमी, भंडारा | सकाळी 9 वा. | समता भूमी भंडारा |
| 2. | 2 जानेवारी 2026 | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे स्मृती दिवस आणि दानशूर देवाजी भीवाजी खोब्रागडे जन्म दिवस | धम्मदूत बुद्ध विहार, नागपूर एक दिवसीय कार्यशाळा | सकाळी 11 ते सायं. 4:30 पर्यंत | धम्मदूत बुद्ध विहार, कबीर नगर-शाखा, पावरग्रिड समोर, कबीर चौक जवळ, नारी रोड, नागपूर |
| 3. | 3 जानेवारी 2026 | क्रांतिसूर्य सावित्रीबाई जोतीराव फुले जयंती | हिवरी नगर, नागपूर | सायं. 6:00 | तथागत बुद्ध विहार, हिवरी नगर |
| 4. | 4 जानेवारी 2026 | 1946 के मुंबई जातीय संघर्ष में शहीद दिन | राम नगर, नागपूर एक दिवसीय कार्यशाळा | सकाळी 12 ते सायं. 5:30 | अत्त-दीप-भव बुद्ध विहार, पांढराबोडी पोलीस चौकी जवळ, राम नगर |
| 5. | 5 जानेवारी 2026 | डॉ. भदंत आनंद कौसल्यायन जयंती | बुद्धभूमी महाविहार | सकाळी 9 वा. | बेरखेडा खैरी, कामठी रोड, नागपूर |
| 6. | 6 जानेवारी 2026 | बाबू हरदास एल.एन. जन्म दिवस (जयभीम.! बलभीम.! घोषणा दिन) | स्मृतीभूमी हरदास घाट कन्हान नदी | सकाळी 10वा. | हरदास स्मृती स्मारक, हरदास घाट कन्हान नदीच्या काठी, कन्हान |
| | | | बोधिमग्गो महाविहार, इमामवाडा, नागपूर | सकाळी 10वा. | भदन्त बोधिविनीत परिसर, बोधिमग्गो महाविहार, भीमनगर, इमामवाडा, नागपूर |
| 7. | 7 जानेवारी 2026 | 1946 चे जातीय संघर्षात नागपूर चे शहीदांना श्रद्धांजली | गज नालंदा बुद्ध विहार-सोनगाव | सायं.6:00 वा | सोनेगाव विमानतळ, खामला रोड, नागपूर |
| 8. | 8 जानेवारी 2026 | अंतर्राष्ट्रीय धम्म ध्वज दिन | शाखा बाठोडा | सायं.6:00 वा | सरोदे नगर, बाठोडा पोलिस स्टेशन जवळ, नागपूर |
| 9. | 9 जानेवारी 2026 | सी.पी.एन्ड बेरार प्रांताचे कामगार महकार शिक्षाक्षेत्राचे सेनानी लोकप्रिय बाबु हरदास एल.एन. स्मरण पर्व | शाखा पिंपळा फाटा | दुपारी 12 ते सायं. 4:30 | पिंपळा फाटा हुडकेश्वर रोड, नागपूर |
| 10. | 10 जानेवारी 2026 | क्रांती कवी नाट्य कलावंत, नाट्य लेखक, प्रखर पत्रकार बाबु हरदास एल.एन. स्मरण पर्व | अंगुलीमाल बुद्ध विहार | सायं.5:00 वा | अंगुलीमाल नगर, मोठा इंदोरा नारी रोड, नागपूर |
| 11. | 11 जानेवारी 2026 | महार समाज संघटना, तरुण महार संघ, प्राण यज्ञ दल, स्वयं सेवा पथकाचे संस्थापक बाबु हरदास एल.एन. स्मरण पर्व | शाखा भांडेवाडी | सकाळी 11वा | एस.एस.डी. प्रशिक्षण केंद्र, स्टेशन रोड भांडेवाडी, नागपूर |
| 12. | 12 जानेवारी 2026 | राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिर व राजमाता जिजाऊ जयंती दिन | स्मृतीभूमी हरदास घाट कन्हान | दुपारी 2:00 ते | मु.पो.कन्हान, त.पारसिवनी, जि.नागपूर |
| 13. | 13 जानेवारी 2026 | राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिर | स्मृतीभूमी हरदास घाट कन्हान | दुपारी 2:00 ते | मु.पो.कन्हान, त.पारसिवनी, जि.नागपूर |
| 14. | 14 जानेवारी 2026 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ नामविस्तार दिवस | स्मृतीभूमी हरदास घाट कन्हान | दुपारी 2:00 वा | मु.पो.कन्हान, त.पारसिवनी, जि.नागपूर |
| 15. | 15 जानेवारी 2026 | 85 हरदास मेळावा; पथ संचालन मार्च प्रारंभ बौद्ध विहार, डॉ.आंबेडकर नगर नाका नं.-7 | स्मृतीभूमी हरदास घाट कन्हान नदीच्या काठी/ शिवार | सकाळी 8:00वा; दुपारी 2:00 वा | मु.पो.कन्हान, त.पारसिवनी, जि.नागपूर |
| 16. | 16 जानेवारी 2026 | राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिर | स्मृतीभूमी हरदास घाट कन्हान | सकाळी 9:30वा | मु.पो.कन्हान, त.पारसिवनी, जि.नागपूर |


बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648